पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १६८ ■ गुरूवार, दि. २५ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६
RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com







# पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नाताळनिमित्त केली प्रार्थना

वृत्तसंस्था २५ डिसेंबर

**नवी दिल्ली:** ख्रिसमसच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दिल्लीतील कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशनमध्ये पोहोचले. याठिकाणी त्यांनी प्रार्थना सभेतही सहभाग घेतला. हे कॅथेड्रल चर्च केवळ सर्वात जुन्या चर्चपैकी एक नाही तर दिल्लीतील सर्वात मोठे चर्च देखील आहे. पंतप्रधानांनी येथील प्रार्थना सभेतही भाग घेतला, यासोबतच त्यांनी लोकांना ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पीएम मोदींसोबत अनेक लोकही चर्चमध्ये उपस्थित होते. हे चर्च केंद्रीय सचिवालय मेट्रो स्टेशनजवळ आहे.

पंतप्रधान मोदींनी चर्चची छायाचित्रे सोशल मीडियावर पोस्ट करत,'ते दिल्लीतील कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशनमध्ये ख्रिसमसच्या सकाळच्या प्रार्थनेला उपस्थित होते. प्रेम, शांती आणि करुणेचा शाश्वत संदेश या प्रार्थनेतून दिसून येतो. आशा आहे की नाताळच्या भावनेने आपल्या समाजात एकोपा आणि बंधुता येईल' असे म्हटले. कॅथेड्रल चर्च त्याच्या सुंदर वास्तुकलेसाठी ओळखले जाते. दरवर्षी ख्रिसमसनिमित्त येथे खास सजावट केली जाते. दिल्लीच्या कानाकोपऱ्यातून लोक प्रभू येशू ख्रिस्ताची प्रार्थना करण्यासाठी आणि ख्रिसमसचा सण साजरा करण्यासाठी या चर्चमध्ये पोहोचतात. याआधीही पंतप्रधान मोदींनी येथे भेट दिली होती. मोदींनी आणखी एका पोस्टमध्ये चर्चला जातानाचा व्हिडिओ शेअर केला आहे. त्यात लिहिले होते,' ख्रिसमस नवीन आशा, आपुलकी आणि दयाळूपणाची सामायिक वचनबद्धता घेऊन येवो. द कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशन येथे ख्रिसमसच्या सकाळच्या मासची काही झलक. पंतप्रधान मोदी पहिल्यांदाच चर्चमध्ये गेले नाहीत. याआधीही ते चर्चला गेले होते.



ख्रिसमसची भावना आपल्या समाजात सुसंवाद आणि बंधुता आणेल, असेही नरेंद्र मोदींनी सांगितले. कॅथेड्रल चर्चला तिच्या सुंदर वास्तूकलेसाठी ओळखले जाते. दरवर्षी नाताळसाठी विशेष सजावट केली जाते. संपूर्ण दिल्लीतील लोकं प्रभू येशू ख्रिस्ताची प्रार्थना करण्यासाठी आणि नाताळ साजरा करण्यासाठी या चर्चमध्ये येतात.

## संसदेच्या आवारात स्मार्ट उपकरणांच्या वापरावर बंदी

वृत्तसंस्था २५ डिसेंबर

**नवीदिल्ली:** संसदेच्या आवारात स्मार्ट चष्मा, स्मार्ट पेन, स्मार्ट घड्याळे यासारख्या डिजिटल उपकरणांच्या वापराबाबत खासदारांनी सावध राहण्याचे आवाहन लोकसभा सचिवालयाने केले आहे. लोकसभा सचिवालयाने याविषयी माहिती देताना,'अशा उपकरणांच्या वापरामुळे खासदारांच्या गोपनीयतेवर परिणाम होऊ शकतो आणि संसदेच्या विशेषाधिकारांचे उल्लंघन देखील होऊ शकते' असे म्हटले आहे. याविषयी माहिती देताना स्मार्ट चष्मा, पेन कॅमेरा आणि स्मार्ट घड्याळे यांसारखी अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेली अनेक डिजिटल उपकरणे देशात सहज उपलब्ध असल्याची आठवण लोकसभेच्या बुलेटिनद्वारे खासदारांना करून देण्यात आली.

# सर्व लाडक्या बहिणींचे लक्ष मोबाईल संदेशाकडे

## पैसे जमा न झाल्यामुळे महिलांमध्ये प्रचंड नाराजी

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** राज्यातील लाडकी बहीण योजनेबाबत एक मोठी अपडेट समोर येत आहे. ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही लाडक्या बहिणींच्या खात्यात गेल्या दोन महिन्यांपासून योजनेचे पैसे जमा झालेले नाहीत. मोबाईलवर मेसेजची रिंग वाजताच, बँकेचाच मेसेज असावा अशी आशा महिलांना वाटते, मात्र प्रत्यक्षात पैसे जमा होत नसल्याने महिलांमध्ये आता तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. आगामी महापालिका निवडणुकीत या नाराजीचा मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीनंतर आता लाडकी बहीण योजनेच्या अनुदानाबाबत उलट-सुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. यामुळे सर्व लाडक्या बहिणींचे डोळे मोबाईलच्या संदेशाकडे लागले आहेत. गेल्या वर्षी जुलै महिन्यात राज्य सरकारने सुरू केलेल्या या योजनेमुळे महिलांमध्ये मोठी आशा निर्माण झाली होती. पात्र महिलांच्या खात्यात दरमहा १५०० रुपये जमा होत असल्याने, तालुक्यातील हजारो महिलांना मोठा आर्थिक आधार मिळाला होता. मात्र, गेल्या एक-दोन महिन्यांपासून योजनेची रक्कम खात्यात जमा न झाल्याने, राज्यातील सर्व लाडक्या बहिणींचे लक्ष सतत मोबाईलवर येणाऱ्या बँकेच्या मेसेजकडे लागले आहे. योजनेच्या सुरुवातीला याला चांगला प्रतिसाद मिळाला होता, पण नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर योजनेच्या अंमलबजावणीसाठी एकामागून एक नवे नियम लागू करण्यात आले. या बदललेल्या नियमांचा थेट फटका लाभार्थी महिलांना बसला आहे. परिणामी, अनेक महिलांना योजनेतून बाहेर काढले गेले, तर काहींचे पैसे येणे बंद झाले. या सर्व घडामोडींमुळे आता नियमित हप्ता मिळणाऱ्या महिलांनाही 'पुढचा हप्ता नक्की कधी येईल' याबाबत शाश्वती राहिलेली नाही. आज अनेक महिला या आशेवर आहेत की कधीतरी बँकेचा मेसेज येईल आणि पैसे जमा होतील. ग्रामीण आणि शहरी भागात महिलांमध्ये 'हप्ता आला का' अशी विचारणा होताना दिसत आहे. पैसे खात्यात न आल्यामुळे आपले नाव लाभार्थी यादीतून तर कट झाले नाही ना? अशी भीतीही महिलांच्या मनात घर करू लागली आहे. विशेष म्हणजे, ई-केवायसी करूनही पैसे मिळत नसल्याने महिला आपली नाराजी उघडपणे व्यक्त करत आहेत.

# सावरखेड टोलनाक्यावर मारहाण !

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** वाशिम महामार्गावर येणाऱ्या सावरखेड टोल नाक्यावर कार्यरत कर्मचाऱ्यांची दादागिरी आणि मुजोमातरी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे, शुल्लक कारणांवरून वाहनचालकांशी अर्वाच्च भाषेत बोलणे, आणि वेळप्रसंगी वाहन चालकांना मारहाण करण्या पर्यंत यांची मजल वाढली आहे, एका वाहन चालकाला चक्क लाठ्या-काठ्यांनी बेदम मारहाण करीत सोन्याची चैन लंपास केल्याचा प्रकार समोर आला आहे इतक्या अमानुष रीतीने त्याला मारहाण करण्यात आली की त्याचा जीव जातो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती त्या टोल



नाक्यावर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या दादागिरीवर संबंधित विभागाने किंवा पोलिसांनी अंकुश लावावा अशी मागणी होत आहे. अकोला वाशिम रस्त्यावरील टोल नाक्यावर कर्मचाऱ्यांची दादागिरी लाठया काठयांनी वाहन चालकाला केली बेदम मारहाण मारहाण करीत वाहन चालकाची सोन्याची चेन लंपास केली .



# भाजपने मुंबईत शिवसेनेच्या जागा वाढवल्या !

## राज-उद्धव ठाकरेंच्या युतीच्या घोषणेचा परिणाम; एकनाथ शिंदेंची नाराजी कायम

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**मुंबई :** आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बुधवारी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी मुंबईत शिवसेना-मनसे युतीची घोषणा केली. शिवसेना आणि मनसे एकत्र आल्याने मुंबईतील मराठी व्होटबँक त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहील, असा अंदाज वर्तविला जात आहे. हा धोका ओळखून आता भाजपने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी मुंबई महानगरपालिकेच्या जागावाटपाच्या पहिल्या बैठकीत भाजपने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसाठी २२७ पैकी फक्त ५२ वॉर्ड सोडण्याची तयारी दाखवली होती. मात्र, आता राज-उद्धव यांच्या युतीनंतर भाजपने शिंदे गटाला जास्त जागा सोडण्याची तयारी दाखवली आहे. भाजपने शिंदे गटाला ५२ वरुन ७० जागांवर लढण्याचा प्रस्ताव दिला आहे. मात्र, भाजपच्या या प्रस्तावावरही शिवसेना नाराज असल्याची माहिती समोर आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपने शिवसेनेला ७० जागा सोडण्याची तयारी दाखवली आहे. भाजपकडून पहिल्या चर्चेत शिवसेनेला ५२ जागांचा प्रस्ताव देण्यात आला होता. तेव्हा शिवसेनेचे नेते प्रचंड नाराज झाले होते. मात्र, यानंतर शिवसेना-भाजपच्या जागावाटपाच्या बैठकांमध्ये चर्चा होऊन भाजपने आता ७० जागा सोडण्याची तयारी दाखवली आहे. परंतु, शिवसेनेकडून १०० जागांची मागणी करण्यात आली आहे. मात्र, भाजपने त्याला नकार दिल्याची माहिती आहे. त्यामुळे अद्याप शिवसेना-भाजपमध्ये २५ ते ३० जागांचा तिढा कायम आहे. दोन्ही पक्षांमध्ये जागावाटपावरुन रस्सीखेच सुरु असून आज पुन्हा भाजप शिवसेनेच्या नेत्यांमध्ये बैठक पार पडणार आहे. या बैठकीत हा तिढा सुटणार का, हे बघावे लागेल. मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बुधवारी रात्री भाजप नेत्यांबरोबर महत्त्वाची बैठक पार पडली. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी काल रात्री उशिरापर्यंत मुंबई पालिकेसाठी खलबतं सुरु होती.

# लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन प्रत्येकाने मतदान करा : डॉ. सुनील लहाने

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** १५ जानेवारी रोजी अकोला महापालिकेचे नवीन सदस्य निवडण्यासाठी मतदान होणार आहे. मनपा प्रशासन निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तयारी करीत आहे. लोकशाहीच्या उत्सवात १८ वर्षावरील मतदार यादीत नाव असलेल्या प्रत्येकाने मतदान करावे असे आवाहन महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुनील लहाने यांनी केले.

२०११ च्या जनगणनेनुसार महानगरातील २० प्रभागात ८० जागांसाठी मतदान होणार आहे.



झोन निहाय सहा निवडणूक निर्णय अधिकारी आणि तीन सहायक निवडणूक अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच त्यांची कार्यालये कार्यरत झाली आहे. २३ ते ३० डिसेंबर पर्यंत नामांकन अर्ज दाखल करण्यात येत आहे. ३१ रोजी छाननी होईल आणि ३ जानेवारी रोजी चिन्हांचे वाटप करण्यात येईल. सकाळी ७.३० ते ५.३० मतदान होणार आहे. २५ आणि २८ रोजी सुट्टी असल्याने नामांकन अर्ज दाखल करता येणार नाही. ३० तारखे पर्यंत इच्छुक उमेदवारी अर्ज दाखल करू शकतील. लोकशाही प्रक्रियेबाबत डॉ. सुनील लहाने म्हणाले, केंद्रापासून स्थानिक स्वराज्य संस्थे पर्यंत कारभार लोकशाहीच्या आधारे चालतो. अकोला शहरात ५.५० लाख मतदार आहेत. विकासाला चालना तसेच लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानात हिरीरीने भाग घ्यावा असे आवाहन आरआरसीच्या माध्यमातून करीत असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. मतदान जागृतीसाठी पथनाट्य, विविध ठिकाणी फ्लेक्स लावले आहेत.

### सहा झोनमध्ये मतमोजणी होणार

१६ जानेवारी रोजी झोन निहाय सहा ठिकाणी मतमोजणी होणार आहे. त्या झोन मधील स्ट्राँग रूम पोलिस बंदोबस्तात राहणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील गोदाम, मंगरूळपीर रोडवरील गोदाम, पोलिस वसाहत परिसर व अन्य स्थाने यासाठी निश्चित केल्याचे डॉ. सुनील लहाने यांनी सांगितले. आरआरसी नेटवर्क साठी नेहा पाटील यांनी आयुक्तांची मुलाखत घेतली.

# इच्छूकांची संख्या वाढली एक हजार अर्जांची झाली खरेदी

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** मंगळवार पासून महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली. बुधवारी पण मोठ्या संख्येत अर्जांची विक्री महापालिकेने केली. एकाही इच्छुक उमेदवाराने प्रत्यक्षात उमेदवारी अर्ज दाखल न केल्याने पहिला आणि दूसरा दिवस 'निरंक' ठरला. दरम्यान, सर्वच कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी इच्छुक उमेदवारांची मनपा कार्यालयात गर्दी दिसून येत आहे.आज ख्रिसमस निमित्त शासकीय सुट्टी आहे.

नामनिर्देशन प्रक्रियेचा बुधवार दूसरा दिवस नामनिर्देशन दाखल न झाल्याने निरंक गेला. मंगळवार, बुधवार कोणत्याही झोनमध्ये प्रत्यक्ष अर्ज दाखल झाले नाहीत. काही इच्छुकांनी एका पेक्षा अधिक प्रभागातून उमेदवारीची शक्यता तपासण्यासाठी एकाहून अधिक नामनिर्देशन पत्रे घेतली आहेत. प्रमुख राजकीय पक्षांमध्ये अद्याप उमेदवार निश्चिती, जागावाटप आणि युती-आघाडीच्या चर्चांचा निर्णय झालेला नाही. त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी घाई न करता परिस्थितीचा अंदाज घेण्यावर भर दिल्याचे दिसून येत आहे. एकापेक्षा अधिक प्रभागातून अर्ज खरेदी करण्याचे प्रमाण लक्षवेधी असून, यावरून पक्षांतर्गत स्पर्धा आणि संभाव्य बंडखोरीची शक्यताही नाकारता येत नाही. स्थानिक आघाड्या, अपक्ष आणि प्रस्थापित पक्ष यांच्यातील राजकीय समीकरणे अद्याप अस्पष्ट आहेत. पुढील काही दिवसांत राजकीय चित्र स्पष्ट होताच नामनिर्देशन प्रक्रियेला गती येईल, तसेच खरी निवडणूक रणधुमाळी सुरू होईल. उमेदवारी अर्ज स्वीकारण्यासाठी २० प्रभागांना सहा झोनमध्ये विभागण्यात आले असून, त्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांमार्फत उमेदवारी अर्जाची खरेदी व स्वीकृती होत आहे.

### तब्बल आठ वर्षांनी निवडणुक

सन २०१७ मध्ये झालेल्या निवडणूकीनंतर तब्बल ८ वर्षांनी ही निवडणूक होत आहे. त्यामुळे इच्छूकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. लोकशाहीत जुन्या नगरसेवकांना नागरिक विसरले असून नव्या दमदार उमेदवारांच्या शोधात नागरिक आहे. त्यामुळे यंदा इच्छूकांची संख्या मोठी आहे. अशा परिस्थितीत चार उमेदवारांच्या प्रत्येक प्रभागात प्रत्येकी दहा ते वीस उमेदवार रिंगणात राहणार आहेत. म्हणजे एका प्रभागातून किमान किमान तीस ते पन्नास उमेदवार रिंगणात असतील. जितके जास्त उमेदवार तितकी जास्त डोकेदूखी राजकीय पक्षांना असेल.

## निवडणुकीसाठी ६२८ मतदान केंद्र, सहा ठिकाणी मोजणी

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** महापालिका निवडणुकीचा बिगुल वाजला असून, या निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान तर १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल. त्या अनुषंगाने महापालिका निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली असून, मतदान प्रक्रियेसाठी अकोला शहरातील तब्बल ६२८ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहेत.

महापालिकेच्या प्रत्येक प्रभागात चार जागा असतील. काही महानगरपालिकांच्या काही प्रभागांत तीन अथवा पाच जागा असतील. स्थानिक स्वराज्य संबंधित संस्थांच्या निवडणुकांसाठी क्षेत्रात संगणकीय प्रणालीद्वारे नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे दाखल करण्याची सुविधा राज्य निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिली आहे. राजकीय पक्षांची मागणी लक्षात घेऊन महानगरपालिका पद्धतीनेच नामनिर्देशनपत्रे दाखल निवडणुकीत पारंपरिक ऑफलाइन करता येतील.



सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५

http://epaper.citynewssuperfast.com

## शहर वाहतुकीत तात्पुरता बदल; पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे पोलीसांचे आवाहन

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अमरावती:** वेलकम टी पॉइंट ते कांता नगर मार्गावर (पाथवे- हॅपी स्ट्रीटवर) मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकांसाठी सकाळी वेलकम टी पॉइंट ते बियाणी चौक मार्गावरील वाहतुक बंद ठेवण्यात येत असल्याची माहिती अमरावती शहर वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी दिली आहे.

हे मार्ग बंद असतील : वेलकम टी पॉइंट कडून बियाणी चौकाकडे येणार एकतर्फी मार्ग कालावधी रविवार दि. २८ डिसेंबर २०२५ या तारखेस सकाळी ६ ते रात्री ८ वाजेपर्यंत बंद राहील.

हे असतील पर्यायी मार्ग: वेलकम टी पॉइंट व पंचवटी चौकापासून कांता नगर चौक किंवा प्रादेशिक परिवहन कार्यालय मार्ग हे पर्यायी मार्ग असतील. वरील वाहतुक नियमन रूग्णवाहिका, अग्नीशामक वाहन, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अत्यावश्यक सेवेच्या वाहनांना लागू राहणार नाही.

# डॉ. पंजाबराव देशमुख केवळ विदर्भापूरते मर्यादित नव्हते !

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अमरावती :** मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात पहिले डॉ. पंजाबराव देशमुख विचार साहित्य संमेलन संपन्न झाले. संमेलनाचे उद्घाटक म्हणून मराठी विद्यापीठाचे कुलगुरू अविनाश आवलगावकर, प्रमुख अतिथी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ महेंद्र ढोरे, सत्राध्यक्ष म्हणून शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय हर्षवर्धनजी देशमुख तर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ.सतीश तराळ उपस्थित होते. संमेलनाचे प्रास्ताविक व स्वागतपर भाषण स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांनी केले. त्यांनी पंजाबराव देशमुख विचार साहित्य संमेलनाच्या आयोजन मागील भूमिका स्पष्ट करून पंजाबराव देशमुख यांचे जीवनातील विविध पैलू स्पष्ट केले भाऊ साहेबांवरील पहिले विचार साहित्य संमेलन महाविद्यालयात आयोजित होत आहे याचा आनंद व्यक्त केला. अविनाश आवलगावकर म्हणाले डॉ. पंजाबराव देशमुख यांचे व्यक्तिमत्व विविध गुणांनी नटलेले होते. ते बहुपेडी व्यक्तिमत्व होते. त्यांचे कार्य राष्ट्रीय स्तरावरील असून ते विदर्भापुरते मर्यादित झाले आहे म्हणून




त्यांच्या कार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार विदर्भा बाहेर होणे आवश्यक आहे. प्रकुलगुरू महेंद्र ढोरे म्हणाले पंजाबराव देशमुख दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्व होते त्यांनी कृषी व शिक्षणाच्या क्षेत्रात मोठे योगदान दिले त्यांच्यामुळे बहुजन समाज मोठ्या प्रमाणात शिक्षित झाला. उद्घाटन समाधान समारंभाचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख म्हणाले भाऊसाहेबांचा विचार विदर्भा बाहेर पोहोचवण्यासाठी गेल्या दोन वर्षापासून आम्ही दरवर्षी महाराष्ट्रभर १२५ व्याख्यानांचे आयोजन संस्था कळते. वैदिक धर्ममीमांसा हा भाऊसाहेबांच्या प्रबंधावर तीस अभ्यासकांनी लिहिलेल्या लेखांचा ग्रंथ आम्ही प्रकाशित केला. भाऊसाहेबांचा विचार महाराष्ट्रभर पोहोचवण्याचे आमचे प्रयत्न आहेत व त्याला यश येत आहे. संमेलनाध्यक्ष डॉ.सतीश तराळ म्हणाले डॉ. पंजाब रावांसाठी कृषीरत्न ,लोकमहर्षी, शिक्षणमहर्षी ,कर्मयोगी ,ज्ञान योगी ,प्रेषित ,कोहिनूर ,कल्पतरू, युगंधर, शुक्रतारा ,अशा सारखी विशेषणे उपमा वापरल्या जातात पण यापैकी कोणत्याच विशेषणात उपमेत ते सामावत नाहीत. गांधीजी, गाडगेबाबा प्रमाणे त्यांनाही उपमा देता येत नाही .ते महात्मा फुले यांचे सच्चे वारसदार,शक्तीशाली लोकनेते, महान समाजसुधारक, समाजशास्त्रज्ञ, शिक्षणशास्त्रज्ञ, शेतकऱ्यांचे कैवारी होते. त्यांचे संसदेतील कार्य अत्यंत मोलाचे असून संविधान निर्मितीमधील त्यांचा वाटा मोठा व महत्त्वाचा आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. ते खरे राष्ट्ररत्न धर्ममीमांसक व भारताचे भावी पंतप्रधान होते. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन डॉ. मंदा नांदुरकर यांनी केले. उद्घाटन प्रसंगी संमेलनाध्यक्ष डॉ.सतीश तराळ यांच्या शुक्रतारा या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तकात पंजाबराव वरील विविध ऐंशी कवींच्या कवितांचा समावेश असून त्याला डॉ. सतीश तराळ यांची दीर्घप्रस्तावना आहे.

### साहित्य संमेलनातील सूर

दुसऱ्या सत्रात 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे अलौकिक कार्य' या विषयावर परिसंवाद झाला अध्यक्ष स्थानी जनसारस्वत डॉ सुभाष सावरकर होते. या परिसंवादात डॉ राजेश मिरगे, प्रा.संदीप तडस, प्रा.अनिल प्रांजाळे,डॉ योगिता पिंजरकर, प्रा.ममता म्हस्के यांनी आपले विचार मांडले. तिसऱ्या काव्य बोली या सत्रात डॉ. पंजाबराव देशमुख त्यांच्यावर कविता लिहिलेल्या कवींच्या कवितांचे कवी संमेलन संपन्न झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य राज यावलीकर होते. कवी संमेलनाचे बहारदार संचलन प्रा.विठ्ठल कुलट यांनी केले. या कवी संमेलनात कृष्णकांत पराते, गीता निर्वाण, अरुण बुंदेले, प्रा. राजू शिंदे, सुशीला म्हळसने, संजीवनी काळे, सिंम्ररेला देशमुख, राणी नागापुरे,अजय धोटे, अतुल ठाकरे, छाया पाथरे, नीलिमा भोजने, राजेश महल्ले या कवींनी भाग घेतला. कथा बोली या प्राचार्य स्मिता देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या भाऊसाहेबांच्या जीवनातील कथांच्या कथनाच्या कार्यक्रमात विनोद तिरमारे, आशा फुसे ,डॉ मंदा नांदुरकर यांनी आपल्या कथा सादर केल्या. अध्यक्ष डॉ. स्मिता देशमुख यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांची आई राधाबाई यांची कथा साभीनय सादर केली. संचलन प्राध्यापक श्रेयस काळमेघ यांनी केले. संमेलनाची सुरुवात ग्रंथपूजनाने झाली. याप्रसंगी ग्रंथप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. संमेलनाचा समारोप राजेश महल्ले यांच्या शेतकऱ्यांच्या व्यथा व्यक्त करणाऱ्या कवितेने करण्यात आला. संमेलनाचे यशस्वीतेसाठी कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंदा महाविद्यालयाचे कर्मचारी संशोधन विभागाचे विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

## खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी अटक

प्रतिनिधी २५ डिसेंबर



**अमरावती:** शहर गुन्हेशाखे कडुन २ तासात खुनाचा प्रयत्न करणा-या दोन आरोपी तसेच दोन विधीसंघर्षीत बालक यांना अटक अमरावती गुन्हे शाखेची कारवाई

अमरावती : २४/१२/२०२५ रोजी पो.स्टे. फेजरपुरा हददीतील तक्षशिला कॉलेज समोर मुददसर शहा नासीर शहा रा. फेजरपुरा या युवकावर अज्ञात काही इसमांनी जिवघेणा हल्ला करून आरोपी पसार झाले होते. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांनी तात्काळ पथकासह घटनास्थळ गाठून आरोपी अटक करणेबाबत पथकाला आदेशीत केले.

गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनिय माहीती प्राप्त झाली की, सदरचा गुन्हा आरोपी नामे १) संकेत सुभाषराव ईरपुढे उर्फ येडा, वय १९ वर्ष, रा. फ्रेजरपुरा अमरावती, २) शुभम उर्फ शुभ्भु इंदोले, वय २१ वर्ष, रा. शाम नगर अमरावती तसेच ३) दोन विधीसंघर्षीत बालक यांनी केला आहे. सदरची माहीती प्राप्त होताच पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात गुन्हे शाखेच्या पथकाने अमरावती शहराच्या वेगवेगळ्या भागातून मोठ्या शिताफीने दोन आरोपी व दोन विधीसंघर्षीत बालक यांना ताब्यात घेतले. नमूद आरोपींनी सदर गुन्हा केल्याची कबूली दिली असून त्यांना पुढील कारवाईकामी पो.स्टे. फ्रेजरपुरा यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने व्यावसायीक कौशल्याचा वापर करून गुन्हयातील सर्व आरोपींना अवघ्या २ तासात अटक केली आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे १) संकेत सुभाषराव ईरपुढे उर्फ येडा, वय १९ वर्ष, रा. फेजरपुरा अमरावती, २) शुभम उर्फ शुभ्भु इंदोले, वय २१ वर्ष, रा. शाम नगर अमरावती ३) दोन विधीसंघर्षीत बालक सदर ची कारवाई . पोलीस आयुक्त . राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे, सपोआ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक श्री. संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात, पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर, जहीर शेख, संग्राम भोजने, अतुल संभे, सुरज चव्हाण, राजीक रायलीवाले, निखील गेडाम, संदीप खंडारे, यांनी केली आहे.

## माझी संकल्पना- सर्वोत्कृष्ट संकल्पना या आत्मविश्वासाने स्पर्धेत सहभागी व्हा - कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते

### जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६: विभागीय पात्रता फेरी उत्साहात आणि यशस्वीरित्या संपन्न

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अमरावती:** जागतिक स्तरावर तरुणांच्या कौशल्यांना वाव देणाऱ्या आगामी 'जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६' साठी आयोजित करण्यात आलेली विभागीय पात्रता फेरी आज दि. २४ डिसेंबर २०२६ रोजी अत्यंत उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विभागातील अनेक गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यांचे प्रदर्शन केले. या स्पर्धेच्या माध्यमातून अमरावती विभागातील प्रतिभावान युवक-युवतींना आपली कौशल्ये जागतिक स्तरावर सिद्ध करण्याची आणि अमरावती विभागाचे नाव उंचावण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.



डॉ. श्रीकांत जिचकार सभागृह, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत अमरावती विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम या पाच जिल्ह्यातील वय वर्ष १६ ते २४ या वयोगटातील ६३ प्रकारच्या परंपरागत आणि आधुनिक कौशल्य गटातील उमेदवारांनी सहभाग घेतला होता. या विभागीय कौशल्य स्पर्धेत ११४ उमेदवारांची स्कील टेस्ट घेण्यात आली. ही स्पर्धा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील वेगवेगळ्या केंद्रांवर तसेच डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण अमरावती, CADD Info, रेडीयंट हॉस्पीटल येथे आयोजित करण्यात आली होती.

या पात्रता फेरीचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांनी केले तसेच या कार्यक्रमास प्र. कुलसचिव डॉ . नितीन कोळी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, उपायुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता ठाकरे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र , श्रीमती प्रांजली बारस्कर, संचालक निशांत शिंघल, हेल्थी रिफायनरी प्रायवेट लिमिटेड अमरावती, पुष्कर हाते, संचालक तसेच महाराष्ट्र राज्य प्रमुख, CII, उपसंचालक सुधा ठोंबरे, शासकीय ओद्योगिक प्रशिक्षण संस्था अमरावती, संचालक इनक्युबेशन सेंटर श्रीमती स्वाती शेरेकर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती हे उपस्थित होते. या उद्घाटनिय कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. अमोल मोहोड, कौशल्य विकास विभाग यांनी केले.

कार्यक्रम प्रसंगी उद्घाटकीय मार्गदर्शनामध्ये कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी सदर उपक्रमाची प्रशंसा करून यामुळे तळागाळातल्या कौशल्यांना व्यासपीठ प्राप्त झाल्याचे समाधान व्यक्त केले. या तसेच अमरावती विभागातील युवकांच्या कौशल्यांना जागतीक स्तरावर नेण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग प्रयत्नशील असून नक्कीच येथील तरूणाईमध्ये ती कौशल्ये असल्याचा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कौशल्य विकास विभागीय कार्यालय, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तसेच ण्घ्घ् चे पदाधिकारी तसेच इंक्युबेशन सेंटर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी मेहनत घेतली.

## गॅस रिफिलिंग प्रकरणी आरोपीला अटक



प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अमरावती** : २४/१२/२०२५ रोजी पो.स्टे. नागपुरी गेट हद्दीत गवळीपुरा अकॅडमी शाळेजवळ अवैधरित्या ऑटो मधे गॅस रिफिलिंग करत आहे अशी माहिती मिळाली वरून गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी यासीन शहा रहमान शहा, वय ४९ वर्षे, रा गवळीपुरा अमरावती याच्यावर EC ACT प्रमाणे कारवाई करून त्याची जवळून गॅस सिलेंडर व रिफिलिंग साठी लागणारे इतर साहित्य असा एकूण १,१५,५००/- रु चा मुद्देमाल जप्त करून आरोपीस पुढील तपासकामी पो स्टे नागपुरी गेट येथे दिले आहे.

## शिक्षणातूनच प्रगती साध्य करा - मुख्य कार्यकारी अधिकारी संजित महापात्रा

प्रतिनिधी २५ डिसेंबर

### आदर्श हायस्कूल, दर्यापूर येथे डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२७ वी जयंती उत्साहात साजरी

**दर्यापूर :** आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, दर्यापूर येथे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर समाजसुधारक व स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची १२७ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती उत्सवाचे उद्घाटन अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजितताई महापात्रा यांच्या हस्ते पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष . हर्षवर्धन देशमुख होते. प्रमुख अतिथी म्हणून. आमदार किरण सरनाईक (शिक्षक आमदार, अमरावती शिक्षक मतदारसंघ), श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा.




ॲड. जयवंतराव उपाख्य भैय्यासाहेब पाटील पुसदेकर, मा. केशवरावजी मेतकर, तसेच संस्थेचे कार्यकारिणी सदस्य मा. हेमंतजी काळमेघ, मा. प्राचार्य केशवरावजी गावंडे व प्रा. सुभाषरावजी बनसोड यांची उपस्थिती होती.

यावेळी ढवक साहेब (गटविकास अधिकारी), घुगे साहेब (गटशिक्षण अधिकारी) व नंदकिशोर जाधव (गटविस्तार शिक्षण अधिकारी) यांनीही कार्यक्रमास उपस्थिती लावली.

तसेच शाळेचे मुख्याध्यापक मनोज देशमुख, जयंती उत्सव प्रमुख शैलेश कणखर, जयंती उत्सव उपप्रमुख दीपक बन्सी,जयंती उत्सव उपप्रमुख कु. शीलाताई ढोकणे तसेच विशेष निमंत्रित सदस्य, शाळा समिती सदस्य, आजीवन सदस्य, पत्रकार, पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना संजिताताई महापात्रा म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी जीवनात ध्येय मोठे ठेवावे. एखादी गोष्ट मनापासून मिळवण्याची तीव्र इच्छा असेल, तर संपूर्ण विश्व ती पूर्ण करण्यासाठी तुमच्या मदतीला धावून येते.

भाऊसाहेब देशमुख यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचा जो वारसा दिला, तो पुढे नेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

अध्यक्षीय भाषणात हर्षवर्धन देशमुख यांनी शाळेच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील प्रगतीचा गौरव केला. विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्त व मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या जोरावर संस्थेचे व शाळेचे नाव राज्य व देशपातळीवर उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मनोज देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन गजानन घटाळे यांनी तर आभार प्रदर्शन अनिल भारसाकडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट

# खामगाव

## घाटपुरी येथे २२.७८ लाखांची वीज चोरी; तिघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी २५ डिसेंबर

### मागील २४ महिन्यांपासून सुरू होती वीज चोरी!

**खामगाव :** खामगाव तालुक्यातील घाटपुरी येथे मागील २४ महिन्यांपासून वीज चोरी केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध खामगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी महावितरणच्या भरारी पथकाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत उत्तमराव कलोरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, राजेंद्र किसन काळे (५३), सागर राजेंद्र काळे (२८) व पवन राजेंद्र काळे (३५), (तिघेही रा. घाटपुरी, ता. खामगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी व त्यांच्या पथकाने ११ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी दुपारी २:४५ वाजता घाटपुरी येथे आरोपींच्या वीज मीटरची तपासणी केली असता, पीटी स्क्रू सैल करून वीज वापराची नोंद मीटरमध्ये होऊ दिली जात नसल्याचे आढळून आले. यामुळे आरोपी मागील २४ महिन्यांपासून वीज चोरी करीत असल्याचे निष्पन्न झाले. तपासांत १,२६,४४९ युनिट वीज चोरी झाल्याचे उघड झाले असून, त्याची रक्कम २२ लाख ७८ हजार ७४० रुपये इतकी आहे.

## रेती माफियांवर प्रशासनाची कारवाई, ८ टिप्पर जप्त

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**खामगाव :** अवैध रेती उपसा व वाहतुकीमुळे शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारणाऱ्या रेती माफियांना प्रशासनाने जोरदार दणका दिला आहे. दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ठीक १० वाजता कोटेश्वर–जमनापुरी घाट, मौजा नरवेल येथे मलकापूर महसूल व पोलीस विभागाने संयुक्त धडक कारवाई करत रेतीने भरलेले तब्बल आठ टिप्पर पकडले. या जप्त कारवाईची अंदाजे किंमत सुमारे १ कोटी ६२ लाख रुपये असल्याची माहिती आहे.

जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्या आदेशानुसार आणि उपविभागीय अधिकारी मलकापूर संतोष शिंदे यांच्या ठोस मार्गदर्शनाखाली ही कारवाई राबवण्यात आली.



तहसीलदार मलकापूर समाधान सोनवणे यांनी मलकापूर शहरचे ठाणेदार गिरी साहेब यांच्यासोबत थेट मैदानात उतरून रेती माफियांची मुस्कटदाबी केली. या कारवाईत नायब तहसीलदार प्रवीण घोटकर, मंडळ अधिकारी मलकापूर कुलवंतसिंग राजपूत, मंडळ अधिकारी धरणगाव व्ही. एन. कोल्हे, तलाठी धीरज जाधव (मलकापूर), राहुल खर्चे (दसरखेड), महसूल सेवक पंकज जाधव, सचिन चोपडे तसेच पोलीस आरसीबी पथक सहभागी झाले होते. नदी, घाट व पर्यावरणाची लूट थांबवण्यासाठी प्रशासनाने आता 'शून्य सहनशीलता' धोरण अवलंबले असून, अवैध रेती व्यवसाय करणाऱ्यांवर कठोरात कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा या धडक कारवाईतून देण्यात आला आहे. रेती माफियांना पाठीशी घालणाऱ्यांनाही सोडले जाणार नाही, असा कडक संदेश प्रशासनाने दिला आहे. या धडक कारवाईदरम्यान अवैध रेती वाहतूक करणारे एकूण ८ टिप्पर जप्त करण्यात आले असून, त्यामध्ये खालील वाहनांचा समावेश आहे

Mh 28 BB 4172, Mh 28 BB 7935, Mh 28 BB 8910, Mh 28 BB 2895, Mh 28 BB 6174, Mh 28 BB 7397, Mh 28 BB 4414, Mh 28 BB 1210 सदर सर्व टिप्पर हे रेतीने भरलेले असून, प्राथमिक चौकशीत अवैध उत्खनन व वाहतूक होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. संबंधित वाहनचालक व मालकांविरोधात महसूल व खनिज कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# ६ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयामार्फत ४६५ नामनिर्देशन पत्रांचे सशुल्क वितरण

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रं. १ अंतर्गत एकुण ३८ उमेदवारांना ६२ नामनिर्देशन पत्र, निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रं. २ अंतर्गत एकुण ३६ उमेदवारांना ५६ नामनिर्देशन पत्र, निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रं. ३ अंतर्गत एकुण ६२ उमेदवारांना १३५ नामनिर्देशन पत्र, निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रं. ४ अंतर्गत एकुण ५० उमेदवारांना ९६ नामनिर्देशन पत्र, निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रं. ५ अंतर्गत एकुण ३५ उमेदवारांना ५९ नामनिर्देशन पत्र आणि निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रं. ६ अंतर्गत एकुण ३४ उमेदवारांना ५७ नामनिर्देशन पत्र असे ६ झोन मधून एकुण २५५ उमेदवारांनी ४६५ उमेदवारांना सशुल्क नामनिर्देशन पत्र वितरीत करण्यात आले आहे.

## जसनागरा पब्लिक स्कूलच्या राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद



प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** जसनागरा पब्लिक स्कूल येथे आयोजित राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धेस खेळाडू चा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या महोत्सवाचा प्रारंभ मंगळवारी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते व जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट, महाराष्ट्र राज्य बेसबॉल असो.चे उपाध्यक्ष इंद्रजीत नितनवार, राज्य क्रीडा मार्गदर्शक रेवनाथ शेलार, सौ. मनीषा ठाकरे, नलिनी जाधव, डॉ.अभिजीत फिरके तसेच जसनागरा पब्लिक स्कूलचे संचालक सिमरनजीत सिंह नागरा व इतर मान्यवरांच्या उपस्थीतीत करण्यात आला. या स्पर्धांच्या निमित्ताने संपूर्ण शालेय परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले असून, राज्याच्या विविध भागांतून आलेल्या खेळाडूंमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे.

# बांगलादेशातील हिंदू अत्याचारांविरूद्ध अकोल्यात हिंदू जनजागृती समितीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** बांगलादेशात हिंदू समाजावर होणारे अत्याचार, हिंदूंची घरे-दुकाने जाळणे आणि दीपू चंद्रदास या हिंदू तरुणाची कट्टरतावाद्यांनी केलेली निर्घृण हत्या, या घटनांच्या निषेधार्थ हिंदू जनजागृती समिती, अकोला तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देण्यात आली. यावेळी समितीच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि बांगलादेश उच्चायुक्त यांच्या नावे निवेदन सादर करण्यात आले.

बांगलादेशात सातत्याने होणारा हिंदूविरोधी हिंसाचार थांबवण्यासाठी भारत सरकारने आता ठोस पावले उचलणे गरजेचे असल्याचे समितीने म्हटले आहे. बांगलादेशवर तात्काळ आर्थिक, व्यापारिक व राजकीय निर्बंध घालावेत, तसेच तेथील कट्टरतावादी गटांविरुद्ध कठोर आंतरराष्ट्रीय कारवाई करण्यात यावी, अशी




आग्रही मागणी हिंदू जनजागृती समितीने या निवेदनाद्वारे केली आहे.

बांगलादेशातील युवा नेते शरीफ उस्मान हादी यांच्या मृत्यूनंतर तिथल्या हिंदू समाजाला जाणीवपूर्वक लक्ष्य केले जात आहे. १९४१ मध्ये २८ टक्के असलेली हिंदू लोकसंख्या आज केवळ ७-८ टक्क्यांवर येणे, ही 'हिंदू समाज निर्मूलन' प्रक्रियाच आहे, असा खळबळजनक आरोपही समितीने निवेदनात केला आहे.

निवेदन सादर करताना हिंदू जनजागृती समितीचे अमोल वानखडे, अजिंक्य खुरसडे, राजू क्षीरसागर, अजय खोत आणि धनंजय मेहसरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# बांगलादेशातील अत्याचारांविरोधात अकोटमध्ये संतप्त निषेध; जोडे मारो आंदोलन

वि. प्रतिनिधी २५ डिसेंबर



**अकोट :** बांगलादेशात अल्पसंख्याक हिंदू व दलित धर्मीयांवर होत असलेल्या अमानुष अत्याचारांच्या निषेधार्थ अकोट शहरात तीव्र आंदोलन करण्यात आले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे झालेल्या या आंदोलनात बांगलादेशचे राष्ट्रपती युनूस खान यांच्या पुतळ्याला जोडो मारो आंदोलन करत संतप्त भावना व्यक्त करण्यात आल्या.

या वेळी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल तसेच सकल हिंदू समाजाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनादरम्यान बांगलादेशातील घटनांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अल्पसंख्याकांवरील अन्याय थांबविण्यासाठी समाजात जागरूकता निर्माण होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. बांगलादेशातील घटनांमुळे जागतिक पातळीवर मानवतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, धर्मनिरपेक्षतेचे मूल्य जपण्यासाठी सर्व समाजघटकांनी एकत्र येण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

## रोहित रुंगटा मानद डॉक्टरेटने सन्मानित



**अकोला :** स्थानिक सामाजिक कार्यकर्ते व अनेक सेवाभावी संस्थांवर कार्यरत रोहित रुंगटा यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान गांधी पीस फाउंडेशन सेवाग्राम आश्रम, वर्धा येथे आयोजित समारंभात करण्यात आला.हा पुरस्कार नेपालचे डॉ. लालबहादुर राणा यांच्या माध्यमातून डॉ. सुनील परदेशी, डॉ. मानकर व डॉ. मनोहर चव्हाण यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. रुंगटा यांच्या गत २० वर्षांपासून केलेल्या विविध सामाजिक संस्थांचे, कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट योगदान, सामाजिक वचनबद्धता, प्रभावी नेतृत्वक्षमता व मानवकल्याणासाठी केलेल्या अतुलनीय सेवांचा विचार करून त्यांना ही मानद पदवी देण्यात आली. रुंगटा यांच्या कार्यांनी समाजात एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

# सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये 'ख्रिसमस डे' उत्साहात साजरा



प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोट:** सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये २४ रोजी ख्रिसमस डे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाकरिता शाळेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, लुणकरन डागा, प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक ,दीपम लखोटिया, प्रा. द्वारिका प्रसाद बसेर, कविता मिश्रा, भावेश शिरसाट व सुकन्या शिरसाट मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे कुमकुम तिलक करून त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर सरस्वती पूजन झाले.वर्ग चौथी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी ख्रिसमसगीत सादर केले. सेवियर नायक सर यांनी ख्रिसमस गीत सादर केले.सिद्धार्थ अंभोरे

### बहारदार गीतांचा संगम

यांच्या मार्गदर्शनाखाली प्री प्रायमरी ते वर्ग तिसरीच्या विद्यार्थ्यांनी क्रिसमस पर अप्रतिम नृत्य सादर केले. कविता मिश्रा यांनी सर्वांनी आपल्या धर्माबरोबर इतर धर्मांचाही सन्मान केला पाहिजे व आपल्या जीवनात येशू ख्रिस्तासारखी सकारात्मकता आत्मसात करावी हा संदेश देऊन क्रिसमस डे च्या शुभेच्छा दिल्या. द्वारकाप्रसाद बसेर सर यांनी सर्वधर्मात समानता ठेवा हे सांगून क्रिसमस डे च्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी सँताने सर्वांना चॉकलेट व गिफ्ट दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन वैशाली ढगे व अश्विनी हुलहुले यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सांस्कृतिक धनश्री कुलट तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# 'डॅडी देशमुख स्मृती' लघु चित्रपट महोत्सवात' अनेक चित्रपटांची नोंदणी



प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** चित्रपट महर्षी स्व. डॅडी देशमुख स्मृती लघुचित्रपट महोत्सव समितीच्या वतीने ८ व्या लघुचित्रपट महोत्सवाचे आयोजन २७ डिसेंबर रोजी, प्रमिलाताई ओक सभागृह येथे करण्यात आले असुन सदर महोत्सवात लघुचित्रपट महोत्सवाच्या दुसऱ्या टप्प्यात राष्ट्रीय स्तरावर प्राप्त झालेल्या विविध भाषेतील ११०० लघुचित्रपटापैकी निवडक १५ लघुचित्रपट प्रदर्शित करण्यात येतील. अनेक राष्ट्रीय लघु-चित्रपट निर्मात्यांच्या लघुचित्रपटांची मेजवानी अकोलेकर रसीकांना लाभणार असल्याची माहीती आयोजन समितीतर्फे पत्रकार परिषदेत देण्यात आली. ८ वर्षापुर्वी स्व. तुकाराम बिडकर यांचे मार्गदर्शनात हा लघु चित्रपट महोत्सव सातासमुद्रपार झाला असुन स्व. बिडकरांच्या जीवनावर सुद्धा एक लघुचित्रपटसुध्दा यावेळी प्रदर्शित करण्यात येणार आहे. विदर्भाच्या कलाक्षेत्रात अष्टपैलु कर्तुत्व गाजवणारे विदर्भ चित्रपट पंढरीचे चित्रपट महर्षी डॅडी देशमुख यांचे स्मृतीप्रित्यर्थ लघुचित्रपट महोत्सवाचे उद्घाटन २७ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता दाळू गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली तर खाअनुप धोत्रे यांचे हस्ते होणार आहे. यावेळी लेखिका मनीषा कोरडे यांची प्रमुख उपस्थिती राहील. चित्रपट सृष्टीतील उत्कृष्ट व चौफेर कामगिरी बद्दल जेष्ठ कलावंत सतीश पिंपळे यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान केला जाईल. तसेच फिल्म दिग्दर्शक शेखर रणखांबे व युवा दिग्दर्शक साहिल इंगळे यांचाही सत्कार करण्यात येणार आहे. चित्रपट दिग्दर्शक संजय शर्मा, दिग्दर्शीका वैशाली केंधळे, दिग्दर्शक निलेश जळमकार, डॉ. राजेश देशमुख, विशाल कांबळे यांच्या उपस्थितीत समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रमात स्पर्धेत पात्र ठरलेल्यापैकी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळालेल्या लघुचित्रपटांना रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन आयोजकांच्या वतीने गौरविण्यात येईल.

# माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना विनम्र अभिवादन




प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त पूर्वसंध्येला भारतीय जनता पार्टी कार्यालयात दीपोत्सव साजरा करून सुशासन तसेच राष्ट्रवादाचा मंत्र देणारे अटलजी यांना अभिवादन करण्यात आले.

भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, विजय अग्रवाल, जयंत मसने, माधव मानकर, वैशाली शेळके, पवन महल्ले यांच्या हस्ते दीप प्रज्वलन तसेच अन्नदानसह विविध सामाजिक उपक्रम राबविले. सुशासन सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंती पासून लोकनेते आमदार गोवर्धन शर्मा यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम अकोला महानगरात आयोजित करण्यात येणार आहे. आज भाजपा कार्यालयात सायंकाळी विधिवत पूजन करून भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी माधव मानकर, अजय शर्मा, संजय गोटफोडे, अंबादास उमाळे, आशा अग्रवाल, प्रकाश अग्रवाल, जानवी डोंगरे संतोष डोंगरे, संजय जोशी गिरीश जोशी, ऋचा शाह, शिवा हिंगणे, जितेंद्र देशमुख, विजय शिरसाट , जमीर हुसेन, वसंता मानकर, आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत किरकोळ शस्त्रक्रिया पूर्व तपासणी शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** जिल्ह्यात जिल्हाधिकारी वर्षा मिना व उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. सुशील वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल यांच्या नियोजनात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत विविध आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून DEIC, जिल्हा स्त्री रुग्णालय, अकोला येथे रविवारी किरकोळ शस्त्रक्रिया पूर्व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. असलम तसेच सोलर फ्लेक्स मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. कृष्णकुमार केसान यांच्या मार्गदर्शनाखाली तपासण्या करण्यात आल्या.

शिबिरामध्ये जिल्ह्यातील ० ते १८ वर्षे वयोगटातील एकूण ४७ लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली. यापैकी ४० रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदान करण्यात आले असून, या सर्व रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व DEIC कार्यक्रमांतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत उपलब्ध असलेल्या विविध आरोग्य सेवांचा लाभ जनतेने घ्यावा, असे आवाहन डॉ. आरती कुलवाल, जिल्हा शल्यचिकित्सक, अकोला यांनी केले आहे.




# खंडाळा महावितरणचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

## ◆ विजेच्या धक्क्याने म्हैशीचा मृत्यू , मदतीची मागणी

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोट:** महावितरण विद्युत मंडळाचा बेढंगी बेताल अतिशय भोंगळ कारभार आज म्हैशीच्या मुक्या जनावराच्या जीवावर उठला आहे, गावातील अल्पभूधारक मजूर देविदास बाजीराव सांगूनवेढे यांची बुधवार दि २४ डिसेंबरला सकाळी नेहमीप्रमाणे १२ वाजता च्या दरम्यान गुरे चरायला घेऊन जात असताना त्यांची दोन जीवाची गाभण म्हैस वय अंदाजे ८ वर्ष किंमत सव्वा लाख रुपये असून एकदमच गावलगत गावठाण वरील विद्युत रोहित्र जवळून जात असताना विद्युत रोहित च्या तारेच्या तानाला धक्का लागतात जाग्यावरच मृत्यू झाला या घटनेबाबत देविदास सांगूनवेढे, यांनी विद्युत मंडळात रितसर तक्रार दाखल केली असता विद्युत मंडळाचे कर्मचारी यांनी घटनास्थळावर पाहणी दरम्यान विजेचे जिवंत तार ताना लागून असल्याचे स्पष्टपणे निदर्शनात आले याच रोडवरून शेतकरी आणि गावातील नागरिक



लहान मुलं कितीतरी वेळा रहदारी करतात अशातच जर एखाद्या मनुष्याची जीवित हानी झाली असती तर याला महावितरण अधिकाऱ्यांनी भरपाई दिली असती काय असा प्रश्न गावातील ग्रामस्थांकडून महावितरणच्या अधिकाऱ्यांविरोधात होत आहे. हे रोहित्र कितीतरी महिन्यापासून बेवारस उघडेच असल्याने मोठा धोका निर्माण झाला आहे यावरच न थांबता गावामध्ये ठिकठिकाणी केबल टाकला तर तो कुठे आजही विजेचा तार लोंबकळत आहे या जिवंत लोंबकळत असलेल्या तारा मुळे केव्हाही जीवित हानी होणे नाकारता येत नाही हीच या झालेला घटनेला महावितरणच्या अधिकाऱ्यांचा भोंगळ कारभार जबाबदार असून याबाबत संबंधित अभियंता यांचे सोबत भ्रमणध्वनी वरून संपर्क साधला असता शेतकऱ्यांच्या व गावातील समस्या संदर्भात कधीच फोन उचलत नाहीत. आडगाव येथील पशुवैद्यकीय अधिकारी यांनी कीते मॅडम यांनी त्या म्हैशीचे छवविच्छेदन केले असले तरी त्यात सव्वा लाख रुपये किमतीचे म्हैश विजेच्या महावितरण भोंगळ कारभारामुळे मृत्युमुखी पडल्याने जणू काही घरातील सदस्य दगावला आहे अशा या दुःखाच्या व आर्थिक बजेटाने फार डभघाईस आला आहे तरी महावितरणने झालेल्या नुकसान भरून तात्काळ द्यावे अशी मागणी त्यांनी महावितरण कडे लेखी तक्रार अर्ज देऊन केली आहे तसेच गावातील उघडे असलेल्या रोहित्र व लोंबकळत असलेल्या जिवंत तारेचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी गावातील नागरिक जोर धरत आहेत.

# किड्स झोन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे



प्रतिनिधी २५ डिसेंबर

**बार्शिटाकळी:** किड्स झोन इंग्लिश मीडियम स्कूल, बार्शिटाकळी येथे २० रोजी वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन शंकरराव जवंजाळ यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास महादेवराव भुईभार हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते, तर डॉ. सुभाषराव गावंडे अध्यक्षस्थानी होते. यावेळी उपाध्यक्ष सौ. आशालता गावंडे, सचिव योगेश गावंडे व मुख्याध्यापक सौ. प्रियंका गावडे , जयश्री सुनील ढगे, लक्ष्मी बोळे, पुजा मराठे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागत गीताने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाटिका व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी निवडलेली सर्व गाणी ही १९९० च्या दशकातील जुनी व लोकप्रिय गाणी होती, ज्यामुळे उपस्थित प्रेक्षकांमध्ये विशेष उत्साह निर्माण झाला. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्तिका प्रकाश खाडे (वर्ग – युकेजी) व सर्वेश अरुण काकड (वर्ग – ५ वी) यांना उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून सन्मानित करण्यात आले. प्रमुख मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

# सौर ऊर्जा अक्षय ऊर्जा काळाची गरज : जिल्हाधिकारी वर्षा मीना

## ◆ राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त कार्यशाळा

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** जिल्ह्यात सौर ऊर्जेचा वापर वाढविणे ही काळाची गरज असून पर्यावरण संरक्षणासोबतच शाश्वत विकासासाठी सौर ऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावणार आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले.

त्या राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताह निमित्त नियोजन भवन येथे ऊर्जा बचत काळाची गरज ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व व सध्याची शासनाची धोरणे या विषयावर आधारित कार्यशाळेत बोलत होत्या.

यावेळी महाऊर्जा जिल्हा व्यवस्थापक विजय काळे,ऊर्जा व्यवस्थापन परीक्षक अच्युत मेहंदळे व विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.



जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीवर १५० किलोवॅट पारेषण संलग्न सौर विद्युत निर्मिती प्रकल्प सुरू झाल्यामुळे वीजबिलात बचत होत असून ऊर्जेच्या बाबतीत आत्मनिर्भरता साधण्यासाठी हा महत्वाचा टप्पा ठरत आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी सौर व हरित ऊर्जेचा स्वीकार करून हरित आणि उज्ज्वल भविष्यासाठी योगदान द्यावे.

ऊर्जा परीक्षक श्री. मेहेंदळे म्हणाले की, वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि ऊर्जा गरजा लक्षात घेता पारंपरिक ऊर्जास्त्रोतांवरचा ताण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर सौर ऊर्जा हा स्वच्छ, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक पर्याय ठरत आहे. सौर ऊर्जेच्या वापरामुळे कार्बन उत्सर्जन कमी होऊन हवामान बदलाच्या समस्येवर नियंत्रण मिळविता येईल.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५

# राळेगावात दोन बालविवाह रोखले; चाइल्ड हेल्पलाईनची कारवाई

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**यवतमाळ :** राळेगाव तालुक्यातील गोपालनगर परिसरात होऊ घातलेले दोन बालविवाह जिल्हा प्रशासनाने वेळेवर हस्तक्षेप करून रोखले. २३ डिसेंबर रोजी चाइल्ड हेल्पलाईन १०९८ वर मिळालेल्या गोपनीय माहितीनंतर ही कारवाई करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, दोन अल्पवयीन मुलींचे वेगवेगळ्या ठिकाणी विवाह आयोजित करण्यात आले होते. अंगणवाडी सेविकेकडील नोंदी तपासल्यानंतर दोन्ही मुलींचे वय १६ वर्षे असल्याचे स्पष्ट झाले. बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ नुसार मुलींसाठी किमान १८ वर्षे वय आवश्यक असल्याने हे विवाह बेकायदेशीर ठरत होते. जिल्हा चाइल्ड हेल्पलाईन यवतमाळच्या पथकाने गाव बाल संरक्षण समिती, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, लोकप्रतिनिधी तसेच राळेगाव पोलिसांच्या मदतीने तातडीने हस्तक्षेप करत हे बालविवाह थांबवले.

# जन्म-मृत्यू नोंदीत घोटाळा; चौकशीसाठी एसआयटी स्थापन

## शेंदुरसनी ग्रामपंचायतीतील प्रकार

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी तालुक्यातील शेंदुरसनी ग्रामपंचायतीमध्ये जन्म व मृत्यू नोंदणीसाठी वापरण्यात येणाऱ्या सीआरएस (Civil Registration System) सॉफ्टवेअरच्या लॉगिनमध्ये अवैध नोंदी झाल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणात सायबर गैरप्रकार झाल्याची शक्यता लक्षात घेता राज्य शासनाच्या गृह विभागाने विशेष तपास समिती (एसआयटी) स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.

गृह विभागाने २४ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या कार्यालयीन आदेशानुसार, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी सायबर विभागाच्या नेतृत्वाखाली समिती नेमण्यात आली आहे. ही विशेष तपास समिती सायबर सुरक्षेच्या दृष्टीने संभाव्य त्रुटी, लॉगिनचा गैरवापर तसेच जन्म-मृत्यू नोंदणी प्रक्रियेत झालेल्या बेकायदेशीर हस्तक्षेपाची चौकशी करणार आहे. या एसआयटीचे अध्यक्षपद अतिरिक्त पोलीस महासंचालक (सायबर), महाराष्ट्र राज्य यांच्याकडे देण्यात आले आहे. समितीमध्ये राज्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालयातील आरोग्य सेवा उपसंचालक यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला असून, जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शासन आदेशानुसार, समितीने या प्रकरणातील सायबर सुरक्षेतील उणिवा, सॉफ्टवेअर लॉगिन नियंत्रण, अधिकृत व अनधिकृत प्रवेश यांचा तपास करावा. तसेच भविष्यात अवैध जन्म-मृत्यू नोंदणी प्रमाणपत्रे मिळू नयेत यासाठी आवश्यक कार्यात्मक सुधारणा, तांत्रिक उपाययोजना आणि प्रशासकीय नियंत्रण याबाबत शिफारसी कराव्यात, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. या चौकशीचा अहवाल तीन महिन्यांच्या आत शासनाकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अहवालासोबत समितीने आपले अभिप्राय व शिफारसी सादर कराव्यात, असेही आदेशात नमूद आहे. या प्रकरणाची दखल मुख्यमंत्री कार्यालयासह गृह विभागातील शहरी व ग्रामीण विभागांनी घेतली असून, पोलीस महासंचालकांनाही याबाबत अवगत करण्यात आले आहे. जन्म–मृत्यू नोंदणीसारख्या महत्त्वाच्या व संवेदनशील प्रणालीतील कथित गैरप्रकारामुळे प्रशासनाच्या डिजिटल यंत्रणेवर प्रश्न उपस्थित झाले असून, या प्रकरणातील चौकशीकडे राज्यभर लक्ष लागले आहे.

# यवतमाळात आतंकवाद्यांच्या पुतळ्याचे दहन

## बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारांचा निषेध

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**यवतमाळ :** बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारांच्या निषेधार्थ येथील विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने दत्त चौकात आंदोलन करण्यात आले. यावेळी आतंकवाद्यांचा पुतळा दहन करीत बांगलादेशविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

बांगलादेशात १८ डिसेंबरच्या रात्री हिंदू युवक दीपू चंद्र दास याची हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती. या घटनेच्या निषेधार्थ देशभर विविध ठिकाणी आंदोलने सुरू असून, त्याच पार्श्वभूमीवर बुधवारी (२४ डिसेंबर) सायंकाळी सहा वाजता दत्त चौकात हे आंदोलन करण्यात आले. सत्ता परिवर्तनानंतर बांगलादेशात हिंदूंवर सातत्याने अत्याचार होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. हिंदू समाजाला तातडीने सुरक्षा देण्यात यावी, त्यांच्यासाठी स्वतंत्र राज्याची



निर्मिती करावी, तसेच भारत सरकारने बांगलादेश सरकारवर आंतरराष्ट्रीय दबाव टाकून दोन्ही देशांतील संबंध व आर्थिक देवाण-घेवाण रोखावी, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेचे प्रांत सेवा प्रमुख राम लोखंडे यांनी केली. या आंदोलनात विश्व हिंदू परिषद, बजरंग दल तसेच सकल हिंदू महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. दत्त चौक परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

# पुसद दंगल प्रकरणातील आरोपी निर्दोष



प्रतिनिधी २५ डिसेंबर

**पुसद :** पुसद येथे सन २००८ मध्ये घडलेल्या दंगलप्रकरणाचा अखेर निकाल लागला आहे. या प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

पुसद शहर पोलीस ठाण्याने तपास करून अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल केलेल्या गुन्ह्यातील आरोप न्यायालयाने फेटाळले. सेशन्स केस क्रमांक 72/2009 (शासन विरुद्ध अझरोद्दीन व इतर १०) या खटल्यात सरकारी पक्षातर्फे एकूण दहा साक्षीदार तपासण्यात आले होते. हा खटला अत्यंत वादग्रस्त स्वरूपाचा होता.

निकाल देताना जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश क्र. १, एस. जे. रामगडिया यांनी भा.दं.वि. कलम 147, 148, 149, 324, 427 आणि 395 अंतर्गत दाखल सर्व आरोपांतून आरोपींची निर्दोष मुक्तता केली. आरोपींच्या वतीने ॲड. तनवीर खान यांनी युक्तिवाद केला असून, ॲड. इमरान चव्हाण, ॲड. मिस्बाह, ॲड. अमोल भालेराव यांनी सहकार्य केले. या निकालामुळे संबंधित आरोपींना मोठा दिलासा मिळाला आहे.

# प.पू. सद्गुरु नारायण महाराज जयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रम

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**उमरखेड :** शक्ती ब्रह्माश्रमचे संस्थापक प.पू. सद्गुरु समर्थ नारायण महाराज यांचा जयंती उत्सव गुणवंत महाराज यांच्या उपस्थितीत उमरखेड येथे साजरा करण्यात येणार आहे. उत्सव समितीच्या वतीने आज २५ आणि उद्या २६ डिसेंबर रोजी स्थानिक गोचर स्वामी वार्ड येथील अरविंद ओझलवार यांच्या निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



जयंतीनिमित्त दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, २५ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता प्रार्थना आणि रात्री नऊ वाजता सार्वजनिक भजन कार्यक्रम होणार आहे. २६ डिसेंबर रोजी जयंतीच्या दिवशी सकाळी पाच वाजता प्रात:प्रार्थना, सकाळी सात वाजता गायत्री हवन, सकाळी नऊ वाजता गुरुपूजन तसेच सकाळी दहा ते दुपारी बारा या वेळेत सद्गुरुंचे भजन आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर महाआरती व महाआरतीनंतर दुपारी महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी सहा वाजता प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप करण्यात येणार आहे. या जयंती उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या धार्मिक कार्यक्रमांचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन प.पू. सद्गुरु नारायण महाराज यांच्या समस्त शिष्य मंडळींच्या वतीने करण्यात आले आहे.

# नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**उमरखेड :** नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण झाल्यापासून या मार्गावर अपघातांचे प्रमाण सातत्याने वाढत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. महागाव ते बरड शेवाळा या सुमारे ६७ किलोमीटर अंतरावरील महामार्गावर अपघात प्रतिबंधासाठी आवश्यक यंत्रणा व उपाययोजना अपुऱ्या ठरत असून त्यामुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागत आहे.

या महामार्गावर अपघात टाळण्यासाठी बसविण्यात आलेली यंत्रणा अनेक ठिकाणी बंद अवस्थेत असल्याचे दिसून येते. दुसरीकडे राजोरा–बिजोरा येथे टोल नाका सुरू असून टोल वसुली मात्र नियमितपणे सुरू आहे. मात्र, अपघातग्रस्तांना तातडीची मदत देणे ही टोल नाक्याची जबाबदारी असताना प्रत्यक्षात अशी कोणतीही मदत वेळेवर मिळत नसल्याचा आरोप वाहनचालक व वाहतूकदारांकडून केला जात आहे. नॅशनल हायवे ३६५ संदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अनेक वेळा अपघातग्रस्तांना तात्काळ मदत देण्याची घोषणा केली आहे.

मात्र, प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असून राजोरा–बिजोरा टोल नाक्यावरील कर्मचारी केवळ टोल वसुलीपुरते मर्यादित राहिल्याचे दिसते. अपघात झाल्यानंतर आवश्यक असलेली तत्काळ वैद्यकीय मदत, ॲम्ब्युलन्स व प्रशिक्षित कर्मचारी वेळेवर पोहोचत नसल्याने अनेकांचे प्राण जात असल्याची भावना व्यक्त होत आहे. काही दिवसांपूर्वी नांदगाव घाटात ट्रॅक्टर पलटी होऊन चालकाचा मृत्यू झाला. या घटनेत अपघातस्थळी ॲम्ब्युलन्स जवळपास अर्धा तास उशिरा पोहोचल्याने चालकाचा जीव वाचू शकला नाही, असा आरोप करण्यात येत आहे.

टोल नाक्यावर अपघातग्रस्तांसाठी विशेष पथक नेमण्यात आले असल्याचे सांगितले जाते; मात्र हे पथक वेळेवर घटनास्थळी पोहोचत नसल्याचे वास्तव आहे. तसेच, डॉक्टरांची अनुपस्थिती व अपुऱ्या प्राथमिक उपचारांमुळेही परिस्थिती गंभीर बनत आहे. या सर्व बाबींमुळे वाहनचालक व वाहतूकदारांमध्ये तीव्र नाराजी असून, संबंधित टोल नाक्यावर चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी, तसेच अपघातग्रस्तांसाठी सक्षम सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी केली जात आहे.

# शिक्षण समिती अध्यक्षपदी रामदास धोटे, उपाध्यक्षपदी साधना चांदेकर

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**राळेगाव :** राळेगाव तालुक्यातील पिंपळगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी रामदास धोटे यांची एकमताने निवड झाली आहे. उपाध्यक्षपदी साधना रणजीत चांदेकर यांची निवड करण्यात आली. या निवडीमुळे स्थानिक शैक्षणिक वर्तुळात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आणि इतर शैक्षणिक सुविधांच्या बाबतीत नवीन दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

रामदास धोटे हे स्थानिक स्तरावर शिक्षण क्षेत्रात सक्रिय असून, त्यांच्या नेतृत्वाखाली समिती प्रभावी काम करेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. सौ. साधना चांदेकर यांच्या सहकार्याने शाळेच्या महिला शिक्षण व बालकल्याणाशी संबंधित उपक्रमांना चालना मिळेल.





शिक्षण क्षेत्रातील अशा सकारात्मक बदलांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या भविष्यास उज्ज्वल होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे.

# पुसद येथे शैक्षणिक जनजागृती व मार्गदर्शन

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**पुसद :** स्थानिक हजरत उमर फारूक उर्दू शाळेच्या वतीने शैक्षणिक जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ मोहम्मद शकील इंजिनिअर यांचे मार्गदर्शन लाभले, तर प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षण अधिकारी धीरज काशिराम आडे उपस्थित होते.

हा कार्यक्रम तीन विभागांत आयोजित करण्यात आला होता. सकाळी ९ ते ११ या वेळेत विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक जनजागृती व मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. त्यानंतर सकाळी ११.३० ते दुपारी १.३० या वेळेत शिक्षकांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम पार पडला. शेवटी दुपारी २.३० ते सायंकाळी ४.३० या वेळेत पालकांसाठी शैक्षणिक जनजागृती व मार्गदर्शन




करण्यात आले. या कार्यक्रमासाठी पुसद शहरातील सर्व उर्दू माध्यमांच्या विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व पालकांना निमंत्रित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांचा विकास होणे, त्यांच्या विचारांना चालना मिळणे, शैक्षणिक जागृती निर्माण होणे तसेच क्रियात्मक दृष्टिकोन विकसित होणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

यासोबतच शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात आपली भूमिका कशी प्रभावीपणे पार पाडावी, यावरही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. कार्यक्रमाचा उद्देश प्रत्यक्षात यशस्वीपणे साध्य होत असल्याचे चित्र दिसून आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी हजरत उमर फारूक (र.झी.) उर्दू शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# नव जयहिंद क्रीडा मंडळाच्या पाच खेळाडूंची निवड राज्य खो-खो संघात

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**यवतमाळ :** नव जयहिंद क्रीडा मंडळाच्या पाच खेळाडूंची निवड राज्य खो खो संघात नुकत्याच बुलढाणा येथे संपन्न झालेल्या 44 व्या विदर्भ खो-खो अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत नव जयहीद क्रीडा मंडळाच्या मुला मुलींनी यवतमाळ संघाकडून सहभाग घेत या स्पर्धेत मुलींच्या संघाने उपविजेतेपद प्राप्त केले तर मुलांच्या संघाने तृतीय स्थान प्राप्त केले होते या स्पर्धेमधून नव जयहिंद क्रीडा मंडळाच्या पाच खेळाडूंची विदर्भ खो-खो संघामध्ये निवड झालेली आहे.

यात मुलांमध्ये अमोलकचंद महाविद्यालयाच्या तेजस जवाहर देठे ,चेतन गजानन पुरके तर मुली मध्ये



अभ्यंकर कन्या शाळेच्या कोमल राजेंद्र मडावी, श्रावणी नंदगीर गिरी, आचल गजानन काळे यांचा समावेश आहे वरील खेळाडू दिनांक 29 डिसेंबर ते 5 जानेवारी रोजी गुंजूर बंगलोर कर्नाटक राज्यामध्ये होणाऱ्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेकरिता विदर्भ खो-खो संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत वरील खेळाडू आपल्या यशाचे श्रेय त्यांची आई वडील तसेच नवजय हिंद क्रीडा मंडळाचे प्रदीप वानखेडे, अमोल बोदडे,अविनाश जोशी, कैलास शिंदे बाळासाहेब दौलत्कार,अमोल ढोणे, आशिष प्यारलेवार प्रशिक्षक पंकज रोहनकर ,अविनाश जोशी जम्मू लालूवाले यांना देतात.

# ग्राहक मंच तक्रार निवारणाचे प्रभावी व्यासपीठ : प्रा.देशमुख

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**उमरखेड :** ग्राहक मंच हा केवळ तक्रार नोंदविण्याचा नव्हे, तर तक्रारींचे प्रभावी निवारण करणारा मंच आहे. ग्राहकांच्या समस्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसमोर मांडून त्यांची सोडवणूक करणे हाच ग्राहक पंचायतचा उद्देश असून, या माध्यमातून शोषणमुक्त समाज निर्माण झाला पाहिजे, असे प्रतिपादन उमरखेड तालुका ग्राहक पंचायतचे अध्यक्ष प्रा. प्रकाश देशमुख यांनी केले. राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त (२४ डिसेंबर) उमरखेड तहसील कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार विश्वंभर राणे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने




झाली. त्यानंतर 'जागो ग्राहक जागो' या गीताने कार्यक्रमाला सुरेख प्रारंभ करण्यात आला. प्रा. देशमुख यांनी ग्राहक चळवळीचा आढावा घेत सांगितले की, १९८६ मध्ये ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला, तर २० जुलै २०२० रोजी सुधारित कायदा लागू झाला. या कायद्यानुसार फसव्या जाहिराती करणाऱ्या कंपन्यांसह त्यात सहभागी असलेल्या मोठ्या सेलिब्रिटींवरही कारवाई होऊ शकते. मात्र, आजही ग्राहक चळवळ अपेक्षित गतीने पुढे जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. शासकीय कार्यक्रमाच्या माध्यमातून उपस्थित अधिकाऱ्यांसमोर ग्राहकांच्या तक्रारींचा निपटारा झाला, तरच या कार्यक्रमाला खरे महत्त्व प्राप्त होईल, असे त्यांनी नमूद केले. ग्राहक पंचायतचे कार्याध्यक्ष ॲड. विलासराव देवसरकर यांनी आजवरच्या कामकाजाची माहिती देत विविध नागरी प्रश्न उपस्थित केले. पाणंद रस्ते, इसापूर धरणाचे पाणी उशिरा सोडल्याने झालेली अडचण, रस्ते कामामुळे होणारी धूळ व आरोग्य समस्या, बायपास रस्त्याचे अपूर्ण काम, झाडतोड, बँकांमधील पासबुक एन्ट्रीचा प्रश्न, पाणीपुरवठा, विद्युत बिलांच्या तक्रारी, मीटर बंद पडणे, जंगली प्राण्यांमुळे होणारे शेती नुकसान, एस. टी. महामंडळातील चिल्लर पैशांचा प्रश्न, शासकीय अनुदान विलंब, तसेच माहिती अधिकार कायद्यानुसार सेवा कालमर्यादा पुस्तिका दर्शनी भागावर लावण्याची मागणी यावेळी करण्यात आली. या मागण्यांचे निवेदन ग्राहक पंचायत सदस्य हरिदास इंगोळकर यांनी नायब तहसीलदारांना दिले. माजी गटविकास अधिकारी सुभाष पांडे यांनी ग्राहक संरक्षण कायद्याबाबत सविस्तर माहिती देत, तक्रार दाखल केल्यानंतर त्याचा सातत्याने पाठपुरावा करणे गरजेचे असल्याचे सांगितले. विविध तक्रारींमुळे ग्राहकांना कसा लाभ झाला, याची उदाहरणे देत ग्राहकांनी चळवळीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. नायब तहसीलदार विश्वंभर राणे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना सांगितले की, पाणंद रस्त्यांपैकी ७५ टक्के रस्ते खुले करण्यात आले असून उर्वरित २५ टक्क्यांसाठी अडचणी आहेत. तहसीलमध्ये अर्ज विहित नमुन्यात दिल्यास त्याचा निपटारा वेळेत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. घरकुल, पुरवठा विभाग व इतर तक्रारींसाठी संबंधित विभागांकडे अर्ज करण्याचा सल्ला त्यांनी दिला. विद्युत मंडळाच्या तक्रारींबाबत अधिकारी सागर विहिरे यांनी सोलर पंप, डी. पी., जळालेले ट्रान्सफॉर्मर आदी प्रश्नांवर तोडगा काढला. वजनमापे विभागाच्या तक्रारी जिल्हा परिषद माजी सदस्य रामराव गायकवाड यांनी उपस्थित केल्या. कार्यक्रमास ग्राहक पंचायतचे पदाधिकारी व सदस्य, विविध विभागांचे अधिकारी, महिला वर्ग तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संदीप घाडगे यांनी केले.

# ग्राहकांनी हक्कांसाठी सजग राहावे

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**महागाव :** ग्राहकांनी आपल्या हक्कांप्रती जागरूक राहणे ही काळाची गरज असून कोणत्याही वस्तूची खरेदी करताना पक्के बिल मागणे हा ग्राहकाचा मूलभूत अधिकार आहे. फसवणूक झाल्यास न घाबरता तक्रार करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन तहसीलदार रोहित शिंदे यांनी केले. २४ डिसेंबर १९८६ रोजी भारतात ग्राहक संरक्षण कायदा संमत झाल्याच्या पार्श्वभूमीवर महागाव तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी तालुका कृषी अधिकारी टकले यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शेतीसाठी बियाणे खरेदी करताना ग्राहकांनी विशेष सतर्कता बाळगावी. बियाण्याची पिशवी व पक्के बिल घेतल्याशिवाय खरेदी करू नये. बिलावर दुकानदाराची सही व शिक्का असणे आवश्यक असून, त्यामुळे फसवणूक झाल्यास कायदेशीर कारवाई करणे सुलभ होते.

गॅस एजन्सीचे प्रतिनिधी रवी वाघमारे यांनी गॅस पुरवठ्याबाबत माहिती देताना गुजरात येथून गॅस लिक्विड उशिरा येत असल्यामुळे पुरवठ्यात अडचणी येत असल्याचे सांगितले.

निरीक्षण अधिकारी मोहन कोल्हे यांनी हायवे परिसरात घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर होत असल्याने तुटवडा जाणवत असून अशा अवैध व्यापारावर कडक कारवाई करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले. विनामूल्य कायदेशीर मदत उपलब्ध आनंद वाघमारे यांनी सांगितले की, २०१९ मध्ये ग्राहक संरक्षण कायद्यात महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. ग्राहकांची फसवणूक झाल्यास ग्राहक पंचायतमार्फत विनामूल्य मार्गदर्शन व मदत दिली जाते. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी अध्यक्ष तर जिल्हा पुरवठा अधिकारी सचिव असतात. ग्राहकांनी निर्भयपणे तक्रार करावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी परिविक्षाधीन तहसीलदार रोहित शिंदे, आनंद वाघमारे, केशव चटुले, ए. एस. कनवाळे, अनिल विरखडे, पुसद तालुका अध्यक्ष भावना तायडे यांच्यासह लक्ष्मण दमकोंडावार, रवी वाघमारे, ॲड. अविनाश वजीराबादकर, निरीक्षण अधिकारी मोहन कोल्हे, गोदाम व्यवस्थापक राम बनसोडे, राशन कार्ड लिपिक लखन चव्हाण, परमिट लिपिक ए. एस. कनवाळे, रमेश अकोस्कर, रास्त भाव धान्य दुकानदार व परिसरातील अनेक ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि. २५ डिसेंबर २०२५

# पोखरा योजनेत फसवेगिरी, गावठाण हद्दीत घुसखोरी !

## *तक्रार दाखल, प्रशासनाने घेतली दखल * चौकशी समिती करणार तपास

**● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●**

जिल्ह्यात सन २०१९ ते २०२४ या कालावधीत राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प ( पोखरा ) भाग - १ या योजनेत लाखों रुपयांचा गैरप्रकार झाला असल्याची ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथे पोखरा योजनेत फसवेगिरीतून शासनाची दिशाभूल तर केलीच शिवाय गावठाण हद्दीत अतिक्रमण करून सरकारी जागेत विहीर खोदली असल्याची तक्रार करण्यात आली आहे.त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी वाशिम यांनी तात्काळ दखल घेऊन जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी वाशिम यांना एका पत्रान्वे सखोल चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. परिणामी जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी यांनी चौकशी समिती नेमून सबंधित अधिकाऱ्यांना सदर तक्रारीतील मुद्द्यांची सखोल चौकशी करून आठ दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

प्राप्त माहितीनुसार, रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील शेतकरी वसंत रामराव खडसे यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार दाखल केली आहे. तद्वतच सदर तक्रारीच्या प्रतिलिपी राज्याचे प्रधान सचिव मुंबई, कृषी संचालक पुणे, सहसंचालक अमरावती आणि जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम आदी प्रशासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांनी सदर गंभीर तक्रारीची सखोल चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी उपविभागीय कृषी अधिकारी वाशिम यांच्याकडे सदर चौकशीची जबाबदारी दिली आहे.

सदर तक्रारीत तक्रारदार यांनी म्हटले आहे की, पोकरा योजने अंतर्गत शेलुखडसे येथील शेतकरी ज्ञानेश्वर गजानन खडसे आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात गैरप्रकार करून शासनाची फसवणूक करत एकाच कुटुंबात लाखों रुपयांचे गैरप्रकारे अनुदान लाटले आहे. विशेष करून शेतकऱ्यांसाठी सदर योजना एक वरदान ठरणारी आहे. मात्र काही भ्रष्ट कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी स्वतःच्या आर्थिक स्वार्थापाई योजनाच पोखरून टाकली आहे. एकीकडे विविध निकष लावून आणि त्रुटी काढून गरजवंत लाभार्थी शेतकऱ्यांना योजनेच्या लाभांपासून वंचित ठेवले. तर दुसरीकडे एकाच कुटुंबात लाखों रुपयांचा लाभ दिला आहे. त्याच धर्तीवर शेलुखडसे येथील ज्ञानेश्वर खडसे याने स्वतःच्या नावावर आणि वडील, भाऊ व आई यांच्या नावावर लाखों रुपयांचे अनुदान लाटले आहे. तर त्यात एकाच नावावर अनेक घटकांचा डबल लाभ घेतला आहे. विशेष बाब म्हणजे गट क्रमांक ६३३ मध्ये वडिलोपार्जित जुनी विहीर असताना आईच्या नावावर पोकरा योजनेतून गैरप्रकारे नवी विहीर घेतली आहे. तर ही नवी विहीर खोदण्याआधीच आई व वडिलांच्या नावावर गट क्रमांक ६३३ मध्ये कुठलेही फळझाड न लावता फळबाग लागवडीच्या नावाखाली लाखों रुपयांचे अनुदान हडपले आहे. इतकेच नव्हे; तर या महाशयाने शेलुखडसे येथील त्यांच्या मालकीच्या गट क्रमांक ६०२ ला लागून असलेल्या ग्राम पंचायत गावठाण हद्दीत अतिक्रमण करून सरकारी जागेत विहीर खोदली आहे. आणि गैरप्रकाराचा महाप्रताप म्हणजे सदर अतिक्रमित विहीर खाजगी सात बारावर नोंद करून घेतली आहे. आणि त्याच अतिक्रमित विहीरीच्या नावावर पोकरा योजनेतून १५ ते १६ लाख रुपयांचे नेटशेड घेतले आहे.

पाईप लाईन, आणि महाडीबीटी मधून कृषीच्या अनेक योजनांचा गैरप्रकारे लाभ घेतला आहे. याबाबत तक्रारदार वसंत खडसे यांनी जिल्हाधिकारी वाशिम, उपविभागीय अधिकारी वाशिम आणि तहसीलदार रिसोड यांना निवेदनाद्वारे तक्रार दिली होती. मात्र सदर प्रकरणात कोणीही दखल न घेतल्यामुळे आपण थेट राज्याचे मुख्यमंत्री आणि प्रधान सचिव व ईतर वरिष्ठ स्तरांवर तक्रार दाखल केली असून, सदर गंभीर गैरप्रकाराची सखोल चौकशी करावी व संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी केली आहे. त्या अनुषंगाने उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे पत्र जाक्र/जिअकृअ/तांशा/नादेकृसंप्र/४८१५/२०२५ दि.११ डिसेंबर २०२५ व ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार नुसार तंत्र अधिकारी अनिल राठोड यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर कारवाई ८ दिवसाच्या आत करण्यात यावी जेणेकरून वरिष्ठ कार्यालयास चौकशी अहवाल विहीत वेळेत सादर करता येईल असे नमूद करण्यात आले आहे.

### महत्वाकांक्षी योजनेची लावली वाट...

रिसोड तालुक्यातील पोकरा भाग एक मध्ये समाविष्ट असलेल्या अनेक गावात हीच बोंब असल्याची चर्चा जोर धरत आहे. अनेक गावातील पात्र लाभार्थ्यांना डावलून ठराविक दामाजीपंतांनाच बोगस लाभ दिला असल्याने या महत्वाकांक्षी योजनेची वाट लागली आहे.या बाबतीत आता अनेक पुरावे समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर शेलुखडसे येथील गंभीर तक्रारीची योग्य तपासणी करून पारदर्शक चौकशी केल्यास मोठे घबाड उघड पडणार असल्याचे बोलले जात आहे. शिवाय यातील दोषींवर फसवणुकीचे गुन्हे दाखल करून योग्य ती कारवाई केली तर, नुकत्याच सुरू झालेल्या पोखरा भाग दोन तरी सुरळीत पार पडेल. आणि खऱ्या लाभार्थ्यांनाच लाभ मिळेल असे सुध्दा सुज्ञ लोक बोलत आहेत.

सदर प्रकाराची आपण याआधी तत्कालीन जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस.मॅडम यांच्याकडे व उपविभागीय अधिकारी वाशिम आणि तहसीलदार रिसोड यांच्याकडे गावठाण हद्दीतील अतिक्रमित विहीर खाजगी सात बारावरून हटविण्याची मागणी केली होती.त्या अनुषंगाने रितसर तक्रार सुद्धा केली होती. मात्र सदर तक्रारीची योग्य दखल घेण्यात आली नाही.त्यामुळे आपण थेट राज्याचे मुख्यमंत्री आणि प्रधान सचिव यांच्याकडे ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार केली आहे. माझ्या या गंभीर तक्रारीची सखोल व पारदर्शक चौकशी होईल अशी अपेक्षा आहे !

**वसंत रामराव खडसे** ( तक्रारदार शेतकरी, शेलुखडसे )




## थोडक्यात

### गजानन फुसे यांच्या कविता संग्रहाचा प्रकाशन समारंभ



**● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●**

सरत नाही हंगाम एककल्ली या ग्रामीण कवी गजानन फुसे यांच्या कविता संग्रहाचा प्रकाशन समारंभ पुणे बुक फेस्टीवल फर्ग्युसन महाविद्यालयात पुणे येथे संपन्न काव्याग्रह प्रकाशन वाशिम, ग्रामीण कवी गजानन फुसे यांच्या सरत नाही हंगाम एककल्ली या कविता संग्रहाचे प्रकाशन मा.रणधीर शिंदे, जेष्ठ समीक्षक तथा मराठी विभाग प्रमूख शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या शुभ हस्ते , प्रमूख अतिथी मा.मिलींद जोशी अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि सुप्रसिद्ध साहित्यिक मा.दासू वैद्य यांच्या उपस्थितीत रविवार दिनांक १४/१२/२०२५ला पुणे बुक फेस्टीवल ,, गोल्डन पेज बुक स्टॉल नं. सी१५, फर्ग्युसन महाविद्यालयात पुणे येथे संपन्न झाला या प्रकाशन समारंभाला काव्याग्रहचे व्यवस्थापक श्री विठ्ठल जोशी..संचालक डॉ जयश्री विठ्ठल जोशी' सहाय्यक संपादक श्री तान्हाजी बोऱ्हाडे.. गोल्डन पेज प्रकाशन संचालक अमृता खेतमर, कारंजा (लाड)कवी गजानन शिले आणि कवी गजानन कदम उपस्थित होते.

ग्रामीण कवी गजानन फुसे यांचा या पूर्वी दिवस बोलू देत नाहीत हा कविता संग्रह काव्याग्रह प्रकाशन संपादक श्री विष्णू यांनी ८/६/२०१९ला प्रकाशित केला होता.या कविता संग्रहाला वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला शिवाय यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक 'विशाखा' विदर्भ साहित्य संघ नागपूर, गावगाडा, सेतूबंध, अक्षरोदय उत्कृष्ठ कविता संग्रह पुरस्कार मिळाले. सरत नाही हंगाम एककल्ली हा ग्रामीण कवी गजानन फुसे यांचा दुसरा कविता संग्रह या संग्रहाला प्रकाशित करण्याची संधी काव्याग्रह प्रकाशनाला मिळाली.दिवस बोलू देत नाहीत या कवितासंग्रहाप्रमाणे सरत नाही हंगाम एककल्ली या ही संग्रहास वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळेल असे काव्याग्रहचे संपादक श्री विष्णू जोशी यांनी आपले मत व्यक्त करीत ग्रामीण कवी गजानन फुसे काव्याग्रह कार्यक्रम संपन्न झाला आहे.

### मैत्री पोर्टल २.० मुळे वाशिममध्ये उद्योगांना गती मिळणार

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**

महाराष्ट्र शासनाने उद्योगांना चालना देण्यासाठी व ईज ऑफ डुइंग बिझनेस अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने मैत्री पोर्टल २.० सुरू केले असून, या उपक्रमामुळे जिल्ह्यातील उद्योजकांना वेळेत, पारदर्शक व गुंतवणूकदार–अनुकूल सेवा उपलब्ध होणार आहेत. मैत्री (ईर्ष्ट्रिू्ह्लूै, ऊँीह्ह्नूसहू ईम्र्ट्रूिगदह णत्त) पोर्टल २.० हे एकाच खिडकीतून (सिंगल विंडो) उद्योग स्थापन व संचालनासाठी आवश्यक असलेल्या विविध परवानग्या, नोंदणी, परवाने, नुतनीकरण व मंजुरी ऑनलाईन पद्धतीने देणारे आधुनिक व्यासपीठ आहे.

### एस.टी. प्रशासनाची उदासीनता

## मंगरूळपीर ते दाभडी बससेवा बंद !

***५०० विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात * समनक जनता पार्टीचा आंदोलनाचा इशारा**

**● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●**



मंगरूळपीर आगाराची मंगरूळपीर ते दाभडी ही एस.टी. बस सेवा गेल्या सहा महिन्यांपासून बंद असल्यामुळे भडकुंभा, रामगड, दाभडी व सनगाव परिसरातील सुमारे ४०० ते ५०० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले आहे. एस.टी. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांना मोठा फटका बसत असून नागरिकांत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या मार्गावरील विद्यार्थी फाळेगाव व धानोरा येथील शाळा व महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत आहेत. मात्र, बस सेवा बंद असल्याने त्यांना खाजगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत आहे. खाजगी वाहनचालकांकडून मनमानी व जादा भाडे आकारले जात असून, त्यामुळे गोरगरीब व मध्यमवर्गीय पालक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अनेक वेळा खाजगी वाहने वेळेवर उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे नियमित शिक्षणही बाधित होत आहे.या गंभीर प्रकरणी समनक जनता पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्ष सौ. शितल विष्णू राठोड यांनी मंगरूळपीर आगाराचे डेपो मॅनेजर यांना दि. २३ डिसेंबर रोजी निवेदन सादर केले आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबवण्यासाठी तातडीने किमान एक विशेष मानव मिशन बस तसेच सकाळ व सायंकाळची नियमित एस.टी. बस सेवा सुरू करण्याची ठोस मागणी त्यांनी केली आहे.

मागणी मान्य न झाल्यास समनक जनता पार्टीच्या वतीने मंगरूळपीर डेपो कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. निवेदन देताना समनक जनता पार्टीच्या मंगरूळपीर महिला आघाडी तालुकाध्यक्ष निता चव्हाण यांच्यासह शालेय विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार सोहळा

### *शेतकरी मेळाव्याचे जळगाव येथे आयोजन

**● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●**



सर्वांचे प्रेरणास्थान असलेले भारताचे पहिले कृषीमंत्री भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२७ वी जयंती उत्सव व डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, कृषिभूषण, कृषि प्रक्रिया उद्योग पुरस्कार सोहळा, शेतकरी मेळाव्याचे आयोजन २७ डिसेंबर कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथे करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. कृष्ण बीर चौधरी राष्ट्रीय अध्यक्ष, भारतीय कृषक समाज नवी दिल्ली, मुख्यअतिथी स्मिता वाघ खासदार, जळगांव पुनित श्रीवास्तव अध्यक्ष, पर्यावरण, वन एवं जलवायु परिवर्तन संवर्धन परिषद (भारत), डॉ. अजयसिंग राजपुत रिजनल डायरेक्टर, सेंट्रल मिनिस्ट्री ऑफ ॲग्रिकल्चर, नागपुर, मनोहर खके एम. एस्सी.ॲग्री (कृषितज्ञ, पुणे) ब्रि. राजाराम यादव डायरेक्टर नॅशनल को-ऑप. हरियाणा तर प्रमुख मान्यवर यशवंत तळेले (कृषितज्ञ, जळगांव), विनोद पाटील (कुलसचिव, कवियत्रि बहिणाबाई चौधरी विद्यापीठ, जळगांव, मंगेश देशमुख महासंचालक, छत्रपती शिवाजी लोक विद्यापीठ, किरण पटवर्धन सी.ई.ओ., धुळे, महेंद्रसिंग पाटील, अभिषेक, महेंद्र बजाज प्रिती सिंह, ॲड. अजित तेवतिया, चित्रलेखा मोहंती ओडिसा, पुजा गेरा महिला अध्यक्षा, डॉ. प्रशांत भैस उपस्थितीत संपन्न होणार असुन महाराष्ट्रातील

उत्कृष्ट नाविन्यपूर्ण काम करणाऱ्यांना डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख कृषिरत्न, कृषी भुषण, कृषी प्रक्रिया उद्योग पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. जयंती उत्सव डॉ. सुभाष नलांगे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य, ज्योती सुरसे प्रभारी यांचे मार्गदर्शनात आयोजित करण्यात आला आहे. स्वाती बोरीकर महिला अध्यक्षा महिला उपाध्यक्षा, किरण देशमुख, रुपाली गायकवाड महिला उपाध्यक्षा, विजय संतान, मनोज वानखेडे, संदीप नाईक कार्याध्यक्ष, रावसाहेब पाटील, स्वागताध्यक्ष प्रविण पाटील जिल्हाध्यक्ष, जळगांव यशस्वीतेसाठी प्रयत्नशील आहे. डॉ. पंजाबराव भाऊसाहेब देशमुख यांचे १२७व्या जयंती उत्सवाला भारतीय कृषक समाजाचे राज्यातील शेतकरी, महिला व युवा मोठ्या संख्येने उपस्थित राहाण्याचे आवाहन दिलीप कव्हर वाशीम जिल्हा अध्यक्ष यांनी केले आहे.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेचा अजब कारभार !

### दिव्यांग, वृद्ध व महिलांच्या हक्कांवर घाला, बँक अजूनही दुसऱ्याच मजल्यावर

**● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●**

रिसोड तालुक्यातील ग्राम केनवड येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखेचा निर्णय सर्वसामान्य नागरिकांसाठी जीवघेणा ठरत आहे. जनतेच्या सोयीसाठी असलेली बँकच आज जनतेच्या जिवावर उठली असून, शाखा दुसऱ्या मजल्यावर असल्याने रोज शेकडो खातेदारांना पैशांसाठी जिना चढत जीव धोक्यात घालावा लागत आहे.






या शाखेशी अनेक गावांतील खातेदार जोडलेले आहेत. वृद्धांना पगार काढण्यासाठी, शेतकऱ्यांना पीएम किसानचे पैसे घेण्यासाठी, महिलांना व दिव्यांगांना व्यवहारासाठी प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. दूरवरून आलेल्या वयोवृद्ध अपंग खातेदारांना जिना चढणे म्हणजे रोजची शिक्षा झाली आहे. उंच पायऱ्या, गर्दी आणि घसरण्याचा धोका यामुळे गंभीर अपघाताचा धोका कायम आहे. ग्राहकांच्या हालअपेष्टांकडे बँक प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. पाहणी झाली, चर्चा झाली. पण ठोस निर्णय शून्य.आजतागायत बँक भूतलावर आलेली नाही.ना लेखी आदेश, ना स्थलांतराची तारीख, ना तात्पुरती सुरक्षित व्यवस्था फक्त वेळकाढूपणा.सिटी न्यूज सुपरफास्टच्या वृत्ताची दखलष्ठ पण कृती नाहीदि. ५ ऑगस्ट रोजी सिटी न्यूज सुपरफास्ट या वृत्तपत्रात'दिव्यांग, वृद्ध व महिलांच्या हक्कांवर कुऱ्हाड जिल्हा मध्यवर्ती बँक दुसऱ्या मजल्यावर'या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध झाली होती.या वृत्ताची दखल घेत वरिष्ठ अधिकारी तात्काळ केनवड येथे आले. परिस्थिती लक्षात घेऊन बँकेसाठी भूतलावरील जागेची पाहणी करून ते निघून गेले. मात्र त्यानंतर दोन ते तीन महिने उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही. वर्षासोबत वर्ष गेले.आज २०२५ देखील अखेर संपत आला, मात्र बँक अजूनही दुसऱ्या मजल्यावरच आहे. परिणामी, जिल्हा मध्यवर्ती बँक थेट खातेदारांच्या जीवावर उठल्याचे चित्र निर्माण झाले आहे.नागरिकांचा सवाल स्पष्ट आहे .'पाहणी करून निघून जाणे म्हणजे उपाय आहे का? अपघात झाल्यावरच बँक प्रशासन जागे होणार का?'

जनतेच्या सुरक्षिततेकडे डोळेझाक करून घेतलेला हा निर्णय तात्काळ रद्द करून बँक भूतलावर आणावी, अन्यथा होणाऱ्या कोणत्याही अपघाताची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, अशी ठाम भूमिका खातेदारांनी घेतली आहे.

### 'कोरपे साहेब, आता तुम्हीच लक्ष द्या हो वृद्ध, अपंग खातेदारांचा हा आर्त टाहो !'

केनवड येथील जिल्हा मध्यवर्ती बँक कित्येक दिवसांपासून अजूनही दुसऱ्या मजल्यावरच आहे. दररोज वृद्ध, दिव्यांग व महिला खातेदार जिवावर बेतणारा जिना चढत आहेत. पाहणी झाली, अधिकारी आले, जागा पाहून गेले . पण निर्णय आजही शून्य. हा प्रकार असाच सुरू असून कुणीही ठोस पाऊल उचललेले नाही. आता वेळकाढूपणा नको. आपणच याकडे लक्ष घालावे आणि बँक तात्काळ भूतलावर आणावी, हीच खातेदारांची एकमुखी मागणी आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरूवार, दि. २५ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# अकोला महापालिकेत राष्ट्रवादीचे दोन्ही गट येणार का एकत्र ?

## पुणे, पिंपरी चिंचवड साठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या हालचाली

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** येत्या १५ जानेवारीला महापालिका निवडणुका होत आहेत या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे या निवडणुकांसाठी पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा सुरू आहे. २६ डिसेंबरला याबाबत निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार जाहीर करणार आहेत मात्र त्यापूर्वीच शरद पवार आणि अजित पवार तसेच सुप्रिया सुळे एकाच व्यासपीठावर एकत्र येणार आहेत रविवारी बारामती मध्ये शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशल इंटेलिजन्स सेंटरचे उद्घाटन उद्योगपती गौतम अदानी यांच्या हस्ते होणार आहे यावेळी संपूर्ण पवार कुटुंब उपस्थित राहणार आहे पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला काबीज करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसची आघाडी झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे ज्याप्रमाणे शिवसेना कार्यप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे एक झाले आहेत त्याचप्रमाणे राष्ट्रवादीच्या दोन्ही गटातील आघाडी जाहीर करण्याची केवळ औपचारिकता शिल्लक आहे. ही युती व्हावी अशी अनेक कार्यकर्त्यांची इच्छा आहे अकोला महापालिकेत सुद्धा राष्ट्रवादीचे दोन गट पडले आहेत अकोला महापालिकेची निवडणूक सुद्धा दोन्ही गटाने मिळून लढवावी असा युक्तिवाद दोन्ही गटातील कार्यकर्ते करीत आहेत कारण शहरात आधीच राष्ट्रवादीची ताकद काही प्रभागात आहे त्या प्रभागांमध्ये एमआयएम ने शिरकाव केला आहे, महापालिका निवडणुकीत शिंदे गट आणि अजितदादा गटाशी महायुतीसाठी भारतीय जनता पक्ष तयार असला तरी पक्षाच्या यापूर्वी निवडून आलेल्या ५० पेक्षाही अधिक जागांवर भाजपाने दावा केला आहे त्यानुसारच युतीची बोलणी होईल असा पवित्र भाजपा आमदार रणधीर सावरकर यांनी घेतला आहे त्यामुळे शिंदे गट आणि अजितदादा गटाला कितपत जागा मिळतील याबद्दल साशंकता कायम आहे. मागील महापालिका निवडणुकीत एकत्र राष्ट्रवादीने आठ जागा जिंकल्या होत्या.

परंतु राष्ट्रवादीचे दोन गट झाल्याने त्यांची सुद्धा ताकद जिल्ह्यात विखुरली आहे, परिणामी नगरपालिका निवडणुकीत भाजपाने दणक्यात विजय मिळवला आहे.

जनहित सर्वतोपरी

> “ अकोला हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो, मजबूत संघटन कार्यकर्त्यांची मोठी फळी आणि जिल्ह्यातील चार आमदारांची ताकद भाजपाला महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याचा आत्मविश्वास देत आहे, त्यामुळे भाजपाचा हा उधळलेला वारू रोखण्यासाठी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांनी एकत्र येऊन महापालिका निवडणूक लढवावी असा विचार दोन्ही गटातील कार्यकर्त्यांकडून बोलला जात आहे, एकत्र मिळून लढल्यास भाजपाला शहरात हरवणे मुश्किल नाही हे विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने दाखवून दिले आहे त्यामुळे येत्या महापालिकेत राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येतात की नाही हे पाहणे योग्य ठरणार आहे ”

# महापालिका निवडणुकीत तरुणांना संधी असावी !

## शहर विकासात महत्वाची भूमिका बजावणार

प्रतिनिधी २५ डिसेंबर



मी भारतीय जनता पक्षाचा एक सामान्य सैनिक असून अनेक वर्षा पासून संघटनेच निःस्वार्थपणे काम करीत आहे. निवडणूक एक प्रक्रिया असून पक्ष नेतृत्वा कडून मला अकोला महानगर पालिकेच्या निवडणुकीत संधी मिळाली तर मिळालेल्या संधीच नक्कीच सोन करेल. पक्षाची ध्येय धोरण तळागाळात पोहचविण्यासाठी सदैव कार्यरत राहील. - **स्वनंद कोंडोलीकर**

**अकोला:** राज्यात महानगर पालिका निवडणुकीचे पडघम वाजले असून सर्व पक्ष मोठ्या ताकदीने कामास लागले आहे.राज्यातील भाजपा मिळालेल मोठ यश पाहता अकोला भाजपा कार्यकर्त्याच्या सुद्धा आशा पल्लवित झाल्या आहे. मोठ्या उत्साहाने निवडणूक आखाड्यात उतरला आहे.अकोला शहरातील २० प्रभाग मधील ८० नगरसेवका साठी निवडणूक होणार आहे.मागील निवडणूक मध्ये अकोल्यातील जनतेने भाजपवर विश्वास ठेऊन ४८ नगरसेवक निवडून दिले होते महापौराची माळ सुद्धा भाजप कार्यकर्त्याच्या गळ्यात घातली होती.आता सुध्दा अकोल्यातील जनता भाजपा पहिली पसंती देत असल्याचे वातावरण निर्माण झाले आहे. परंतु भाजप वरीष्ठ नेतृत्वाने नवीन कार्यकर्त्यांना संधी दिली पाहिजे अशी चर्चा सामान्य माणसात मोठ्या प्रमाणात सुरू झालेली आहे .

त्यामुळे भाजपा नेतृत्वाने सामान्य माणसाच्या आवाजाची दाखल घेतली पाहिजे असा चर्चेचा सुरू सुद्धा निघत आहे.नव्या विचारसरणीचे, आधुनिक दृष्टिकोन असलेले, तंत्रज्ञान व सामाजिक बदलांची जाणीव ठेवणारे नवीन नेतृत्व अकोला शहरा साठी काळाची गरज आहे. कारण आजचा काळ वेगाने बदलणारा आहे. जागतिकीकरण, डिजिटल क्रांती,पर्यावरणीय प्रश्न,बेरोजगारी, सामाजिक समतोल,नगर रचना, ट्रॅफिक तथा वाढते अतिक्रमण अशा अनेक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नव्या विचाराच्या शिक्षित दमबाज नेतृत्वाची गरज आहे.

अकोला शहरातील नवीन नेतृत्वाचा विचार केल्यास गौरक्षण भाग असलेल्या प्रभाग मध्ये स्वानंद श्रीकांत कोंडोलीकर यांचा मोठा प्रभाव असून त्यांच्या तीन पिढ्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पार्श्वभूमी लाभली आहे. सार्वजनिक उत्सव पासून सामान्य माणसाच्या सुख दुःख मध्ये निरपेक्ष भावनेने सहभागी होणारा उच्च शिक्षित कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी काही वर्ष मुंबई मध्ये मोठ्या ग्रुप मध्ये काम केले असल्याने सतत प्रयोगशील आहेत. तसेच भारतीय रेल्वेच्या मध्य रेल्वे क्षेत्राचे ते सदस्य सुद्धा होते. शहरातील भवानी पेठ, देशमुख फैल भागात पवन महल्ले भाजपाचा आक्रमक चेहरा समोर आला आहे. भाजपा मध्ये नवीन जरी असले तरी त्यांनी भाजपा ध्येय धोरण स्विकारले आहेत. युवा मोर्चा चा चेहरा म्हणून आज पवन महल्ले आहेत. तसेच कौलखेड भागात कुणाल शिंदे सारखे मोठ्या क्षमतेचे कार्यकर्ते आहेत. गणेश विसर्जन घाट, प्रभागातील जनतेशी जिवंत संपर्क अशा विविध सामाजिक उपक्रमांतून जे अकोला शहराचा चेहरा बदलू शकतात. तरुणांमध्ये इतर राजकीय पक्षांचा विचार केल्यास वंचितचे पराग गवई, व्यापक जनसंपर्क असलेले यश देशमुख, भाजपतर्फे स्वानंद कोंडोलीकर, पवन महल्ले आणि कुणाल शिंदे सारखे अनेक नवीन चेहरे प्रामुख्याने समोर येतात.जुन्या नेतृत्वाचा अनुभव महत्त्वाचा असला तरी अनुभवासोबतच नव्या ऊर्जेची, धाडसाची आणि प्रयोगशीलतेची नवीन नेतृत्व जोखीम आता भाजपा नेतृत्वाने पत्करली पाहिजे. कारण शहर आणि समाजातील सामान्य माणसाच्या समस्या समजून घेण्याची क्षमता त्यांच्यात अधिक असते.अकोला शहरातील राजकारण, शिक्षण, उद्योग, समाजकारण अशा सर्व क्षेत्रांत नवीन नेतृत्वास संधी दिल्यास भाजपास निवडणुकीच्या आखाड्यात कोणीही रोखू शकणार नाही. कारण अशा प्रयोग मुळे प्रशासकीय कामात पारदर्शकता येते आणि भ्रष्टाचाराला आळा सुद्धा बसतो. तसेच येणाऱ्या तरुण पिढीला प्रेरणा मिळते की मेहनत, गुणवत्ता व प्रामाणिकपणाच्या जोरावर नेतृत्वाची संधी मिळू शकते. नवीन नेतृत्व घडवताना मार्गदर्शनाचीही आवश्यकता असते. जुने आणि नवे नेतृत्व यांचा समन्वय साधल्यास अकोला शहराचा सर्वांगीण विकास साधता येतो. अकोला शहराच्या विकास आली प्रगतीसाठी नवीन नेतृत्वास वाव देणे काळाची गरज आहे.

## लेखिका संमेलनाचे उद्घाटन



विदर्भ साहित्य संघाचे लेखिका संमेलन आज प्रभात किड्स येथे सुरू झाले. विदर्भ साहित्य संघ अकोला शाखा च्या कार्याध्यक्ष स्व. सीमाताई शेटे रोटे यांच्या स्मृत्यर्थ लेखिका संमेलनाच्या आयोजन करण्यात आले होते. या लेखिका संमेलनाचे उद्घाटन डॉक्टर श्वेता पेंडसे यांनी केले. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भारती सुदामे , स्वागताध्यक्ष म्हणून नीलिमा पाटील, प्रमुख अतिथी मध्ये डॉ. सुचिता पाटेकर आदींची उपस्थिती होती.



# ॲड. अमोल अंधारे यांचा जिल्हा चिटणीस व प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा

प्रतिनिधी २५ डिसेंबर



**खामगाव :** ॲड. अमोल अंधारे यांनी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा चिटणीस तसेच पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला. राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत ऑक्टोबर २०२४ मध्ये त्यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश करून त्यांना जिल्हा चिटणीस म्हणून जबाबदारी देण्यात आली होती. मात्र काही कारणांमुळे त्यांनी स्वेच्छेने हा निर्णय घेतल्याचे सांगितले आहे.

‘माझ्या संपूर्ण सामाजिक व वैचारिक प्रवासात मला अनेक वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन व भारतीय जनता पार्टी चा सर्वच पदाधिकारी, कार्यकर्ते, मातृशक्ति यांचे खूप सहकार्य मिळाले. त्याची परतफेड मी जीवनात करू शकत नाही. आज सर्व जागी भाजपाची एक हाती सत्ता असताना राजीनामा देण्याची वेळ येत आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची गेल्या वर्षभरात भेट झाली नाही याची खंत मनात आहेच. पक्ष, संघटना व विचार परिवारासाठी काम करण्याची संधी मिळाली, याचा मला अभिमान आहे. भविष्यातही मी राष्ट्रहित व समाजहिताच्या कार्याशी वैचारिकदृष्ट्या जोडलेलाच राहीन,’ असे अमोल अंधारे यांनी सांगितले.

# महात्मा फुले समाज गौरव पुरस्काराने प्रा.डॉ. कैलास नागूलकर सन्मानीत

प्रतिनिधी २५ डिसेंबर





**अकोला:** अखिल भारतीय ’जिरेमाळी परिवर्तन समाज सेवा संघ, व्दारा आज रविवार २१ डिसेंबर २०२५ रोजी उपवर युक्क युवती परिचय सम्मेलन सोहळा मोठ्या उत्साहात माळी भवन खामगांव येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष गुलामनबी आझाद कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बार्शिटाकळी येथील इतिहास विभाग प्रमुख सेवानिवृत्त प्राध्यापक समाज भूषण डॉ. कैलास नागूलकर उद्द्घाटक म्हणून प्राचार्य ओमप्रकाश झिमटे उपस्थित होते. दीप प्रज्वलन मा.

ह.भ.प. गुरूवर्य पुरुषोत्तमजी महाराज कोळसे यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार बळीरामजी सिरस्कार व सौ. मिनाताई भोणे जि.प. सदस्या वाशिम, अरूण घोडे, शिवाजी गोरे उपस्थित होते. तसेच व्यासपीठावरील जेष्ठ, श्रेष्ठ समाज बांधवांच्या हस्ते जीवनसाथी पुस्तिकेचे विमोचन झाले. यावेळी अनेक मान्यवरांनी आपले विचार विस्तृतपणे व्यक्त केले आणि यावेळी आलेल्या अनेक युवक युवतींनी आपला स्टेजवर परिचय दिला.

प्रा.डॉ. कैलास नागूलकर यांचे सामाजिक व शैक्षणिक तसेच विधायक कार्याला अनुसरून या संस्थेने त्यांना महात्मा फुले समाज गौरव पुरस्काराने खालील कामगिरीला अनुसरून सन्मानीत केले. ते दरवर्षी सातत्याने गुणवंत विद्यार्थी सोहळ्या मध्ये दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर व स्पर्धा परीक्षा तसेच विद्यापीठातील प्राध्यापक व संशोधक आचार्य पदवीच्या इतिहास विषयात पीएच.डी. करणाऱ्या संशोधकांना मार्गदर्शक म्हणून सातत्याने मार्गदर्शन व आर्थिक मदत करतात. त्यामुळे समाजातील गोर गरीब व सामान्य विद्यार्थ्यांना त्यांच्या यथोचीत मार्गदर्शनामुळे दिशा मिळाली आहे. त्यांचे जापान या देशामध्ये क्वोटो विद्यापीठात भारतीय स्थापत्य शास्त्रावर संशोधन स्विकृत व प्रकाशीत सुध्दा झाले आहे. तसेच बी.ए. भाग-१ व २ ही अभ्यासक्रमावरील पुस्तके सुध्दा प्रकाशित झाली आहे. विशेष म्हणजे विद्यापीठ राज्य, राष्ट्रिय, आंतरराष्ट्रीय स्तरावर नेहमीच इतिहास संशाधन परिषदे मध्ये सक्रिय सहभाग घेवून व रिसोर्स पर्सन म्हणून सातत्याने मार्गदर्शन करतात. त्यांच्या मार्गदर्शनात ५ विद्यार्थ्यांना पीएच.डी. प्रदान झाली आहे. त्यांना या आपल्या संस्थेने २०१८ मध्ये समाज भूषण पुरस्काराने सुध्दा सन्मानीत केले आहे. तसेच सन २०२२ मध्ये अकोला व अमरावती बहुउद्देशिय जिरेमाळी संस्थे तर्फे त्यांना शैक्षणिक व संशोधन गौरव पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे. तसेच नुकतेच २१ डिसेंबर २०२५ मध्ये अखील भारतीय परिवर्तन जिरेमाळी सेवा संघ या संस्थेने त्यांना महात्मा फुले समाज गौरव पुरस्काराने सन्मानीत केले. या कार्यक्रमाला राज्य व देशभरातून बहुसंख्येने जेष्ठ, श्रेष्ठ समाज बांधव, माता, भगिनी व युवक, युवती मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रभुदासजी बलक यांनी आवर्जून सांगितले की, आपण आपले कार्य असेच पुढे सुध्दा देशपातळीवर सातत्याने करीत राहावे अश्या मनपूर्वक सदिच्छा व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# तिकीट पक्के मानून काहींचा प्रचार सुरू

## सोशल मीडियावर उमेदवारांचा जोरदार प्रचार

प्रतिनिधी २५ डिसेंबर




**अकोला:** महानगरपालिका निवडणुकीसाठी पुढच्या आठवड्यापासून खऱ्या अर्थाने प्रचाराचा धुरळा उडणार आहे. अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर उमेदवारांकडे प्रचारासाठी केवळ ११ दिवसांचा कालावधी उरणार आहे. प्रभागातील ३० ते ३१ हजार मतदारांपर्यंत पोहोचणे हे उमेदवारांसमोर मोठे आव्हान असणार आहे. काही उमेदवारांनी तर आपली उमेदवारी निश्चित मानून आत्तापासूनच प्रभागात प्रचाराला सुरुवात केली आहे.

महानगरपालिका निवडणुकीसाठी नामांकन अर्ज भरण्याची प्रक्रिया मंगळवार, २३ डिसेंबरपासून सुरू झाली असून ती ३० डिसेंबरपर्यंत चालणार आहे. त्यानंतर अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २ जानेवारी आहे. उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप आणि रिंगणातील अंतिम उमेदवारांची यादी ३ जानेवारी रोजी जाहीर केली जाईल. चिन्ह मिळाल्यानंतरच खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष प्रचाराला वेग येतो. चिन्ह नसल्यामुळे अपक्ष उमेदवारांना प्रचार करणे अधिक कठीण जाते. ही सर्व परिस्थिती पाहता, यंदा उमेदवारांना प्रत्यक्ष प्रचारासाठी केवळ ११ दिवस मिळणार आहेत. त्यामुळे संभाव्य उमेदवारांनी आपल्या तयारीचा वेग वाढवला आहे. काही उमेदवारांनी आपले तिकीट पक्के असल्याचे गृहीत धरून आत्तापासूनच घरोघरी पत्रके वाटण्यास सुरुवात केली आहे.

उमेदवारांनी सोशल मीडियावरही प्रचाराचा धडाका लावला आहे. प्रभागातील प्रमुख कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक, गणेश मंडळे आणि सामाजिक संघटनांच्या बैठका घेतल्या जात आहेत.अनेक उमेदवार मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांची मनधरणी करण्यात व्यस्त आहेत. प्रत्येक प्रभागात सुमारे ३० ते ३१ हजार मतदार आहेत. काही प्रभाग भौगोलिकदृष्ट्या अत्यंत मोठे आहेत. इतक्या मोठ्या प्रभागात प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्यासाठी वेळ कमी असल्याने, संभाव्य उमेदवारांनी आतापासूनच जनसंपर्कावर भर दिला आहे. मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी सध्या उमेदवारांमध्ये मोठी चढाओढ पाहायला मिळत आहे.

# मुख्याधिकारीपदी शशिकांत बाबर

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोट :** अकोट नगर परिषदेच्या मुख्याधिकारीपदी शशिकांत बाबर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भातील आदेश राज्य शासनाच्या सचिवांनी २४ डिसेंबर रोजी निर्गमित केले आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव नगरपंचायतीत मुख्याधिकारीपदी कार्यरत असलेले तसेच परीक्षाविधीन अधिकारी गट ‘अ’ संवर्गातील अधिकारी शशिकांत बाबर यांची प्रशासकीय कारणास्तव अकोट नगर परिषदेतील रिक्त मुख्याधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

# हुंडीवाले हत्याकांडाचा निकाल २१ जानेवारीला

प्रतिनिधी २५ डिसेंबर

**अकोला:** येथील व्यावसायिक किसनराव हुंडीवाले यांच्या हत्या प्रकरणाचा अंतिम निकाल २१ जानेवारी २०२६ रोजी जाहीर होणार आहे. युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निकालाची तारीख २१ जानेवारी ठेवली आहे. या प्रकरणात सरकार पक्षाने सलग चार दिवस युक्तिवाद मांडला. त्यानंतर बचाव पक्षाचा युक्तिवाद पूर्ण झाला आहे.

या खटल्यात २४ डिसेंबर रोजी विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांनी सरकार पक्षाचा अंतिम युक्तिवाद केला. बचाव पक्षाने धर्मदाय आयुक्त कार्यालयात आरोपींची उपस्थिती बेकायदेशीर नव्हती, असा दावा केला होता. मात्र, या मुद्द्यावर झालेल्या उलटतपासणीत ॲड. निकम यांनी आरोपी श्रीराम गावंडे यांना वगळता इतर सर्व आरोपी त्या ठिकाणी कोणत्या कारणाने आले होते, असा सवाल उपस्थित केला. सर्व आरोपी खून करण्याच्या उद्देशानेच घटनास्थळी जमले होते, असे सरकार पक्षाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. दरम्यान,काही साक्षीदार तपासण्यात आले नसल्याचा आरोप बचाव पक्षाने सरकारवर केला. त्यावर ॲड. निकम यांनी स्पष्ट केले की, सूरज दिलीप अंधारे याची साक्ष तपासली असता तो साक्षीदार फितूर झाल्याचे स्पष्ट झाल्याने न्यायालयात तसा अर्ज सादर करण्यात आला होता. त्यामुळे संबंधित साक्षीदाराची पुढील साक्ष घेण्यात आली नाही. या हत्याकांड प्रकरणात चार आरोपींचा समावेश नसल्याचे समोर आल्याने तसेच त्यांच्या विरोधात ठोस पुरावे उपलब्ध नसल्याने त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात यावी, अशी विनंती ॲड. निकम यांनी न्यायालयासमोर केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK